बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com
# बेरार टाईम्स
मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे



गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१३ गोंदिया | अंक ११ | बुधवार, दि.२१ फेब्रुवारी २०२४ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

## भजेपार–बोदलबोडीवासींयाचे अर्ध जलसमाधी आंदोलन

### नवीन पुलाचे काम दोन वर्षांपासून रखडले

**सालेकसा:** तालुक्यातील भजेपार–बोदलबोडी दरम्यान वाघ नदीवर मोठे पुल मंजूर असून दोन वर्षापासून बांधकाम रखडलेले असल्याने संतप्त नागरिकांनी चक्क वाघ नदीच्या पात्रात अर्ध जलसमाधी आंदोलन करून शासन प्रशासनाच्या विरोधात आक्रोश व्यक्त केला. यामुळे काही काळ तणावाची परिस्थिती निर्माण झाली.

सविस्तर असे की, मागील ६० ते ७० वर्षापासून पुलाची मागणी होती. अखेर पुल मंजूर झाला, दोन वेळा या पुलाचे भूमिपूजन देखील करण्यात आले. त्या नंतर पुलासाठी खोदकाम करत असताना दगड लागल्याचे कारण देत दोन वर्षापूर्वी खोदकाम अर्धवट ठेवल्याने आधीचा रस्ता बंद पडला. परिणामी नागरीकांना १ किमी अंतरावर जाण्यासाठी १५ किमी फेऱ्याने पायपीट करावी लागत असल्याने प्रचंड आक्रोश खदखदत आहे. अनेकदा निवेदने देऊन सुद्धा सार्वजनिक बांधकाम विभाग झोपेत असल्याने त्याला झोपेतून जागवण्यासाठी २० फेब्रुवारीला अर्ध जलसमाधी आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात भजेपार, बोदलबोडीसह परिसरातील अनेक गावातील नागरिक सहभागी झाले.

भजेपार येथील सरपंच तथा अखिल भारतीय सरपंच परिषदेचे जिल्हाध्यक्ष चंद्रकुमार बहेकार आणि बोदलबोडी येथील सरपंच देवेंद्र पटले तथा दोन्ही गावचे प्रमुख पदाधिकारी यांनी या आंदोलनाचे नेतृत्व केले. दरम्यान सरपंच संघटनेचे गौरीशंकर बिसेन, प्रिया शरणागत, तमील कुमार टेंभरे, नरेश कावरे यांनी आंदोलनात सहभागी होऊन सरपंच संघटनेचा पाठिंबा घोषित करत तेही नदी पात्रात उतरले.



आंदोलनाची तीव्रता अधिक वाढली असता दखल घेत सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता उसेंडी, उप अभियंता मानकर यांनी आंदोलन स्थळी पोहचून लगेच २४ फेब्रुवारी पूर्वी काम सुरू होईल असे लिखित आश्वासन दिले.

दरम्यान कामासाठी मशीन देखील पोहचवली. त्यानंतर नदी पात्रात आंदोलन करत असलेले नागरिक बाहेर आले. राष्ट्र वंदना करून आंदोलनाची सांगता करण्यात आली. आंदोलन यशस्वी झाल्याने नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण होते.

### चुलोद रेल्वे गेटवर साकारणार उड्डाणपुल

**गोंदिया**–रेल्वे गाड्यांच्या वाढलेल्या संख्येमुळे नागरिकांना तासंतास रेल्वे गेटवर थांबून राहावे लागत असते. त्यामूळे नागरिकांना खूप त्रास होऊन त्यांचा वेळ वाया जात असतो.हीच अडचण लक्षात घेऊन रेल्वे विभागाने ङ्गअमृत भारतङ्क योजनेअंतर्गत गोंदिया तालुक्यातील चुलोद रेल्वे गेट वर उड्डाण पूल बांधण्याचा निर्णय घेतला असून येणाऱ्या सोमवारी (ता.२६)पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते डिजिटल ऑनलाइन पद्धतीने शिलाण्यास सोहळा होणार आहे. सदर कार्यक्रमाचे लाईव्ह आयोजन चुलोद रेल्वे गेट परिसरात करण्यात आले आहे.

## मराठा आरक्षण एकमताने मंजूर
### १० टक्के आरक्षण मिळणार

**मुंबई:** राज्य सरकारने मराठा आरक्षणाचा तिढा काही प्रमाणात सोडवण्यात यश मिळवलं आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्य विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनात मराठा आरक्षण विधेयक सादर केलं आणि हे विधेयक एकमताने मंजूर झालं आहे. आता मुख्यमंत्री हे विधेयक विधान परिषदेत मांडणार आहेत. अधिवेशनात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, “२०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक एक – महाराष्ट्र राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्गीयांकरिता मांडत असलेलं आरक्षण विधेयक संमत करावे, असा प्रस्ताव मी सर्वांच्या अनुमतीने मांडतो.” यासह त्यांनी आरक्षण विधेयक विधानसभेच्या पटलावर ठेवलं. यावर विधानसभेतील सर्व सदस्यांनी “होय’ म्हणून अनुमोदन दिलं. त्यावर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी घोषणा केली की, हे विधेयक बहुमतासह संमत करत आहोत.



दरम्यान, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, माझी सभागृहाला विनंती आहे की आपण बहुमत म्हटलं आहे, त्याऐवजी एकमत म्हणायला हवं. कारण विरोधी पक्षांनीही त्याला पूर्ण पाठिंबा दर्शवला आहे. उपमुख्यमंर्त्यांच्या या वक्तव्यानंतर विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी विरोधकांची भूमिका मांडली. वडेट्टीवार म्हणाले, मराठा समाजाला आरक्षण मिळावं ही आमचीदेखील मागणी होती आणि आहे. या विधेयकाला कोणाचाही विरोध नव्हता आणि नाही किंवा विरोध असण्याला काही कारणही नाही. त्यामुळे मी विधानसभा अध्यक्षांना विनंती करतो की, तुम्ही हे विधेयक बहुमताने मंजूर झालं असं म्हणू नका. त्याऐवजी एकमताने मंजूर झालं असं म्हणा, आमच्या त्यास पूर्ण पाठिंबा आहे. यावर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सर्व विधानसभा सदस्यांच्या अनुमोदनानंतर घोषणा केली की, मराठा आरक्षण विधेयक एकमताने मंजूर करत आहोत.

विधेयक मांडण्यापूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले होते, मराठा समाजाचं मागासलेपण सिद्ध करण्यासाठी आपण राज्य मागास–वर्ग आयोगाकरवी राज्यभर सर्वेक्षण केलं. या सर्वेक्षणाचा अहवाल आपल्याकडे आला आहे. आयोगाने चार लाख कर्मचाऱ्यांकरवी अडीच कोटी लोकांची माहिती सर्वेक्षणात गोळा केली आहे.



मराठा समाजात काही लोक पुढारलेले आहेत, तर जास्त लोक मागास आहेत. त्यांच्यावर अन्याय होऊ नये, म्हणून सरकारने या समाजाला आरक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. आरक्षणासाठी आंदोलन करणा?यांनी लक्षात घ्यावं की सरकार कोणताही दुजाभाव करणार नाही. ओबीसी समाजावर अन्याय न करता मराठा समाजाला आरक्षण देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. मी मनोज जरांगे पाटलांना (मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणारे नेते) सांगेन की मराठा आरक्षण देण्याची शपथ घेतल्यानंतर तीन महिन्यांच्या आत हे मराठा आरक्षण दिलं आहे. त्यामुळे ज्यांच्या मनात गैरसमज आहे तो त्यांनी दूर करायला हवा.मराठा समाजाला राजकीय क्षेत्रात आरक्षण नाकारण्यात आले असून शिक्षण व नोकरीमध्ये १० टक्के आरक्षण मंजूर करण्यात आले आहे.

**अध्यादेशावर सहा लाख हरकती**

सुप्रीम कोर्टाने ज्या त्रुटी काढल्या त्या पूर्ण करण्याचं काम करत आहे. आरक्षण टिकून रहावं यासाठी राज्य सरकार सर्व ताकद लावणार आहे.विरोधी पक्षांनाही सोबत ठेवणार आहे. कुणबी दाखला संदर्भात ही समिती काम करत आहे. सहा लाख हरकती आलेल्या आहेत.यावर प्रक्रिया सुरु आहे. जी अधिसूचना काढली आहे त्यावर हरकती आल्या आहेत. त्यावर छाननी सुरू आहे.त्यानंतर पुढील कारवाई केली जाईल.१९६७ पूर्वी नोंदी आहे, त्यांना आरक्षण दिलं जाईल. ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता हे आरक्षण दिले जाईल, असे एकनाथ शिंदे म्हणाले.

शिवरायांची शपथ घेतल्यानंतर तीन महिन्यांत मराठा आरक्षणाचा निर्णय घेण्यात आला आहे.हा सॅम्पल सर्व्हे नाही तर डिप सर्व्हे आहे.अडीच कोटी लोकांचा सर्व्हे करण्यात आला आहे.सरकार कोणताही दुजाभाव करणार नाही. घाईगडबड करणं योग्य नाही. त्यामुळे योग्य निर्णय घेत आहे.

**पान २ वर**

## “या” शहराला लागले गटार योजनेचे ग्रहण

**गोंदिया** : सन २०13 मध्ये केंद्राच्या अमृत योजनेतंर्गत गोंदिया शहरासाठी भुमिगत गटार योजना मंजूर करण्यात आली. या योजनेच्या माध्यमातून शहरातील सांडपाण्याची समस्या मागी लागल्याचे बोलले जात होते. परंतु योजनेत समन्वयाचा अभाव आणि आणि कामात होणारी दरंगाई, यामुळे योजनेच्या भवितव्यावर प्रश्न निर्माण केले जात आहे. योजनेतंर्गत गांधी वॉर्डात पाईप टाकण्यासाठी खोदकाम सुरू आहे. परंतु सदर कामामुळे परिसर पोखरुण टाकण्यात आले की काय?, असेच चित्र निर्माण झाले आहे. अनियोजनपणामुळे ही योजना गोंदिया शहराच्या विकासाला ग्रहण लावत आहे, अशीच चर्चा आता सुरू झाली आहे.

केंद्र सरकारच्या महत्वाकांक्षी योजनेतंर्गत सन २०13 मध्ये भुमिगत गटार योजनेला मंजूरी देण्यात आली. या योजनेसाठी जवळपास १२५ कोटीचा निधीही उपलब्ध करुन देण्यात आला. योजना शहराच्या विकासात भर घालणार, असेच मानले जात होते. परंतु, ही योजना शहराला भकास करणारी ठरत आहे. योजनेचे काम मागील १० वर्षापासून कासवगतीने सुरू आहे. दोन पंचवार्षिक कार्यकाळ लोटूनही योजना पूर्णत्वास केव्हा येणार? याचा अंदाज बांधणेही कठीण झाले आहे. शिवाय योजना राबवित असताना विभागाचा नियोजन शुन्य कारभार वेळोवेळी दिसून आला आहे. यामुळे कोट्यवधीचा निधी खर्च करून करण्यात आलेले रस्त्याचा चुराडा झाला. त्यातही नविन रस्ते बांधकामासाठी मोठ्याने निधी खर्च करणे भाग पडले. असे असूनही योजनेचे कामामुळे शहरवासीयांनी डोकेदुखी वाढली आहे. गांधी वॉर्डात योजनेचे काम सुरूआहे. यामुळे गांधी उकिरड्याचे स्वरुप आले आहे. ठिकठिकाणी करण्यात आलेल्या खोदकामामुळे नागरिकांची कोंडी झाली आहे. रस्ते बंद राहत आहे. या प्रकारामुळे ही योजना विकासाची आहे की विकासाला भकास करण्यासाठी राबविली जात आहे? असा प्रश्न संतप्त शहर वासीयांकडून उपस्थित केला जात आहे.

### योजनेच्या निधीत वाढ

**भुमिगत गटार योजनेसाठी १२५ कोटीचा निधी मंजूर करण्यात आला होता. परंतु, मागील १० वर्षांपासून योजना रेंगाळत असल्याने लागणाऱ्या निधीत सातत्याने वाढ होत आहे. यामुळे १२५ कोटीची योजना २५० कोटीवर जाणार? असेही बोलले जात आहे.**

### पाणी पुरवठा प्रभावित

**योजनेचे काम करताना पाणी पुरवठा करणाऱ्या पाईपलाईनकडे दुर्लक्ष करण्यात आले. यामुळे मागील वर्षभरापासून शहरातील अनेक भागात दुषित पाणी पुरवठा सुरू आहे. याचा शोध घेताना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या अधिकाऱ्यांच्या नाकीनऊ आले. त्यातच मागील आठवडाभरापासून गोंविंदपूर मार्गावर लिकेज शोधण्यासाठी मजिप्राच्या वतीने खोदकाम सुरू आहे. यामुळे संपूर्ण शहरच खड्ड्यात गेल्याचा अनुभव परिसरातील नागरिक घेत आहेत.**

### योजना आणि वाद

**ही योजना सुरुवातीपासूनच वादात सापडली आहे. योजनेच्या कामाला घेवून वाद उफाळून आला होता. यामुळे योजना रखडली होती. दरम्यान वरिष्ठ मंर्त्यांनी पुढाकार घेत तोडगा काढला व योजनेचे काम मजिप्राला देण्यात आले. त्यातही कमिशनखोरी, निकृष्ट बांधकाम, रस्त्याची दुर्दशा आणि होणारे अपघातामुळे ही योजना कायम वादात राहिली आहे.**



## नक्षलवाद्यांचा घातपाताचा मोठा डाव पोलिसांनी उधळला, “कुकर”मध्ये पेरुन ठेवलेली स्फोटके नष्ट



**गडचिरोली** : मोठा घा–तपात घडविण्याच्या उद्देशाने पुरुन ठेवलेली स्फोटके नष्ट करून गडचिरोली पोलिसांनी नक्षलवाद्यांचा डाव उधळून लावला. कुरखेडा तालुक्यातील कोटगुल पहाडीजवळ “कुकर’मध्ये स्फोटके पेरुन ठेवण्यात आली होती. मार्च ते मे महिन्यादरम्यान तीन महिने नक्षलवाद्यांकडून पोलिसांना नुकसान पोहोचविण्यासाठी “टॅक्टिकल काऊंटर ऑफेन्सिव्ह कॅम्पेन’ (टीसीओसी) अभियान राबविले जाते. या पार्श्वभूमीवर ही स्फोटके घातपात करण्यासाठी जमिनीत दडवून ठेवल्याचा अंदाज आहे. सोमवारी कुरखेडा तालुक्यातील कोटगुलपासून ५०० मीटर अंतरावरील पहाडीच्या पायथ्याजवळ गोंडरी जंगल परिसराकडे जाणाऱ्या पायवाटेवर नक्षलवाद्यांनी पोलीस पथकांना नुकसान पोहोचविण्यासाठी स्फोटके व इतर साहित्य पेरुन ठेवल्याची गुप्त माहिती कोटगुलचे प्रभारी अधिकारी धनंजय कुलकर्णी यांना मिळाली होती. त्यांनी बॉम्ब शोधक व नाशक पथकाला (बीडीडीएस) पाचारण करुन जंगल परिसरात शोधमोहीम राबविली. यावेळी अत्याधुनिक उपकरणाद्वारे तपासणी केली असता जमिनीत दीड ते दोन फूट प्रेशर कुकरमध्ये दोन किलो घातक स्फोटके पेरुन ठेवली असल्याचे समोर आले. ही स्फोटके सुरक्षितरीत्या जागीच नष्ट करण्यात आली.

पोलीस अधीक्षक नीलोत्पल, अपर अधीक्षक यतीश देशमुख, एम. रमेश, उपअधीक्षक रवींद्र भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई उपनिरीक्षक धनंजय कुलकर्णी, बीडीडीएस पथक प्रभारी अधिकारी मयूर पवार, हवालदार पंकज हुलके, अनंत सोयाम, अंमलदार सचिन लांजेवार, तिम्मा गुरनुले यांनी केली.

## ओबीसी आरक्षणाला धक्का,संविधानाचा अपमान

### ओबीसी हक्क सभेतील सूर, जातीय तेढ निर्माण करणे सरकारचा उद्देश



**वर्धा:** ओबीसींच्या घटनात्मक आरक्षणाला धक्का हा संविधानाचा अपमान आहे. असा सूर वर्धा शेजारील नालवाडी परिसरात पार पडलेल्या ओबीसी हक्क सभेत उमटला.

वर्धा लोकसभा क्षेत्राची ओबीसी हक्क सभा नालवाडी परिसरातील महात्मा लॉन येथे पार पडली. राज्य व केंद्र सरकारने मागील अनेक वर्ष ओबीसी समाजाची दिशाभूल करुन त्यांच्या न्याय हक्कांशी खेळ केला आहे.


मुख्य प्रश्नावरुन लक्ष हटविण्याचा सतत प्रयत्न केला. सतत दोन समाजात, दोन प्रवर्गात भांडण जुंपवण्याचा प्रयत्न केला जात आहे. यात मोठ्या प्रमाणात ओबीसी समाजातील नागरिकांची पिछेहाट होते आहे. या सर्व मुद्यावर लक्ष केंद्रीत करुन यापुढे एका–एका जातींच्या संघटना नव्हे तर सकल ओबीसी प्रवर्गातील नागरिकांची सामुहिक संघटना मजबूत करण्यासाठी या ओबीसी हक्क मेळाव्यात चर्चा झाली.

या सभेत नागपूरचे नागेश चौधरी, यवतमाळचे विलास काळे, अजय भेंडे, वर्धा येथील प्रा. नूतन माळवी, संभाजीनगर येथील वैभव काळे यांनी मार्गदर्शन केले. केंद्र व राज्यातील सरकार लोकशाही व संविधान संपुष्टात आणण्यासाठी प्रयत्न करीत असून वर्णवादी उच्च–वर्णीय भांडवलदारांना बळ देत असल्याचा आरोप मनोगत व्यक्त करताना मान्यवरांनी केला.

केंद्रातील भाजप सरकारला हाकलून लावण्याचा निर्धार या सभेतून करण्यात आला. संचालन अर्चना भोमले व नितीन झाडे यांनी केले. आभार तुषार पेंढारकर यांनी मानले.

### भारत जोडोतील न्यायाची भूमिका विषद

**ओबीसी हक्क सभेच्या अध्यक्षस्थानी भारत जोडो अभियानचे समन्वयक अविनाश काकडे होते. याप्रसंगी श्रीकांत बारहाते यांनी राहूल गांधी यांची भारत जोडो यात्रेतील न्यायाची भूमिका विषद केली. मनोज चांदुरकर यांनी ओबीसी नेत्यांचे उच्चवर्णीय जातीवादी मानसिकतेकडून होणारे उच्चाटन यावर मांडणी केली. सुरेश बोरकर यांनी ओबीसी विद्यार्थ्यांचे होत असलेले उच्चाटण तर शेती प्रश्नावर किरण ठाकरे यांनी विचार मांडले. कार्यक्रमाला समीर देशमुख, सुदाम पवार, स्टीवन रॉबर्ट, मजीद कुरैशी, सलीम कुरैशी, बाळकृष्ण जगताप, प्रमोद भोमले, सुधीर पांगुळ, मनिष साहू, पुरुषोत्तम खासबागे, द्वारका इमडवार, अनिल अंबुलकर, अनिल रुईकर, नितेश कराळे, प्रा. प्रविण काटकर आदिंची उपस्थिती होती.**



जाणता राजा
छत्रपती शिवाजी महाराज
जयंतीनिमित्त
हार्दिक शुभेच्छा

-:शुभेच्छुक:-



टी.एल.कुंभरे
प्राथमिक मुख्याध्यापक
स्वामी रामकृष्ण आदिवासी आश्रमशाळा
खडकी/बाम्हणी



तथा सर्व शिक्षक,
शिक्षकेत्तर
कर्मचारी वृंद



पी.व्ही.खोब्रागडे
माध्यमिक.मुख्याध्यापक
स्वामी रामकृष्ण आदिवासी आश्रमशाळा
खडकी/बाम्हणी

## संपादकीय

### बोर्डाच्या परीक्षा आल्या; पालकांनी घ्यावी मुलांची काळजी

विद्यार्थ्यांच्या जीवनात दहावी आणि बारावीच्या बोर्डाच्या परीक्षा अतिशय महत्त्वाच्या असतात. याच परीक्षांमुळे त्यांच्या जीवनाची खरी दिशा ठरत असते. बोर्डाच्या परीक्षेचा विचार करता पहिली प्रात्यक्षिक परीक्षा नंतर लेखी परीक्षा असते. या दोन्ही परीक्षांचे एकत्रित गुण विद्यार्थ्यांना दिले जातात हे प्रत्येक विद्यार्थ्यांना माहीत असते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या दृष्किोनातून दोन्ही परीक्षा महत्त्वाच्या असतात. त्यासाठी परीक्षा सुरू होण्यापूर्वी व परीक्षा कालावधीत पालकांनी मुलांची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. खरं म्हणजे, मुलांच्या परीक्षेचा कालावधी जवळ आला की, विद्यार्थी व पालकवर्ग मोठ्या तणावात दिसतात. अशा वेळी दोघांनीही एकमेकांना आधार द्यायचा असतो. बरेच पालक मुलांच्या परीक्षेच्या कालावधीत कामावर न जाता रजा काढून मुलांबरोबर घरीच असतात. तेवढा त्यांना आधार वाटत असतो. तरीसुद्धा यात पालकांनी खचून न जाता मुलांना सांगितले पाहिजे की, आपण वर्षभर खूप मेहनत घेऊन अभ्यास केलेला आहे. कोणत्याही प्रकारचे टेन्शन न घेता बोर्डाची परीक्षा दिली पाहिजे. आतापर्यंत वर्ष सुरू झाल्यापासून तिमाही, सहामाही, पूर्व परीक्षा आणि सराव परीक्षा दिलेल्या आहेत. त्यामध्ये सुद्धा चांगले गुण संपादन केलेले आहेत. तेव्हा आता एकच लक्ष असले पाहिजे ते म्हणजे बोर्डाची लेखी परीक्षा. अगदी आनंदाने आणि हसत मुखाने बोर्डाची परीक्षा देईन अशी प्रत्येक विद्यार्थ्याने जिद्द डोळ्यांसमोर ठेवावी. हीच खरी बोर्डाच्या परीक्षेची तयारी आहे. प्रथम आपल्या मुलांच्या आरोग्याकडे लक्ष द्यावे. त्यानंतर परीक्षेचे वेळापत्रक घरात सर्वांना दिसेल अशा ठिकाणी लावावे. म्हणजे आज कोणत्या विषयाची परीक्षा आहे हे चटकन समजते. बऱ्याच वेळा आपल्या समोर वेळापत्रक नसते आणि जवळची व्यक्ती सांगते, उद्या अमुक विषयाची परीक्षा आहे. अशा वेळी आपल्या मनात संभ्रम निर्माण होतो. यासाठी पालकांनी परीक्षेचे वेळापत्रक घरातील मोक्याच्या ठिकाणी लावावे. त्यासाठी वेळेचे नियोजन योग्य प्रकारे पालकांनी करावे. महत्त्वाची बाब म्हणजे, परीक्षेच्या दिवशी परीक्षेला जाताना आवश्यक कागदपत्रे व साहित्य घेतले की नाही याची खात्री करुनच घरातून परीक्षा केंद्रावर जायला निघावे. परीक्षा केंद्रावर गेल्यानंतर कोणत्या खोलीमध्ये आपल्या मुलांचा आसन क्रमांक आहे याची खात्री करावी. कोणत्याही प्रकारे कॉपी म्हणून पकडले जावू नये अशा वस्तू मुलांसोबत देऊ नयेत. उदाहरणार्थ नोट्स, पुस्तक किंवा महत्त्वाचे मुद्दे असलेली डायरी इत्यादी होय. जरी परीक्षा केंद्रावर घेऊन गेले असेल तरी आपल्या बॅगेत ठेवायला सांगणे. कोणत्याही प्रकारचे नकारात्मक बोलू नये. परीक्षेच्या दिवशी मुलांचा उत्साह वाढवावा.

बऱ्याच वेळा शाळेतील परीक्षेत वेगवेगळ्या पेनांचा वापर करून उत्तर पत्रिका लिहिली जाते. मात्र बोर्डाच्या परीक्षेत असे चालत नाही. त्यामुळे निळ्या शाईच्या पेनाने लिहावे. दोन किंवा तीन पेन जवळ ठेवावेत. त्या आधी त्या पेनाने लिहिण्याचा सराव करावा. असे पालकांनी मुलांना आधीच सांगावे. त्याचप्रमाणे परीक्षागृहात गेल्यावर ज्या सूचना पर्यवेक्षक सांगतील त्या नीट ऐकाव्यात. जर समजले नसेल, तर पुन्हा पर्यवेक्षकाला विचाराव्यात. त्यांच्या व्यतिरिक्त इतर कोणालाही काही विचारू नये, बोलू नये. त्याचप्रमाणे परीक्षा केंद्रावर फळ्यावर लिहिलेल्या काही सूचना असतील, तर त्या काळजीपूर्वक वाचाव्यात असे परीक्षा केंद्रावर जाण्यापूर्वी एक मार्गदर्शक म्हणून पालकांनी आपल्या मुलांना सांगावे. तसेच योग्य सूचनांचे पालन करावे असा वडिलकीचा सल्ला सुद्धा मुलांना द्यावा.आपला आसन क्रमांक अचूक लिहावा. कोणत्याही प्रकारची खाडाखोड करू नये. जर चुकीचे लिहिले गेले असेल आणि त्यांनतर आपल्या लक्षात आल्यावर त्यावर काट मारुन पर्यवेक्षकाची सही घ्यायला विसरू नये हे सांगावे. महत्त्वाची बाब म्हणजे, प्रश्नपत्रिकेवर ज्या सूचना दिलेल्या असतील त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. तसेच वेळेचे नियोजन करुन वेळेत विचारलेले प्रश्न सोडविण्यात यावेत. तेव्हा प्रश्नांची उत्तरे लिहिताना वेळेकडे लक्ष द्यावे हे आवर्जून मुलांना सांगायला हवे.

परीक्षा कालावधीत घरी असताना थोडावेळ खेळ सुद्धा मुलांनी खेळायला हवा. मात्र कोणत्याही प्रकारची इजा होणार नाही याची काळजी पालकांनी घ्यावी. त्याप्रमाणे मुलांच्या दररोजच्या आहारामध्ये बदल करू नये. असे असले तरी मुलांच्या मनावरील ताण वाढणार नाही याची प्रत्येक पालक काळजी घेत असतात. परीक्षा कालावधीत घरा–तील वातावरण हलके–फुलके व अनुकूल ठेवावे. टीव्ही, रेडिओ, डेक यांना आराम द्यावा. काही जोकसुद्धा आवश्यक वेळी करावेत. त्यामुळे अनाठायी वेळ जातो.एकदा निघून गेलेली वेळ पुन्हा येत नाही याचे महत्त्व मुलांना सांगावे. पुस्तके, नोट्स पटकन मिळतील, अशा ठिकाणी ठेवावीत. कोणत्याही प्रकारच्या कारणामुळे मुलांचा ताण वाढणार नाही याची काळजी घ्यावी. या काळात मुलांच्या चुका जरी झाल्या तरी परिस्थिती योग्य पद्धतीने हाताळायला हवी. अगदी टोकाची भूमिका घेऊ नये. तेव्हा बोर्डाच्या परीक्षेमध्ये मुलांना उज्ज्वल यश संपादन करण्यासाठी परीक्षा कालावधीत आपल्या मुलांची काळजी पालकांना घ्यावी लागेल.

**रवींद्र तांबे**

# चक्रवर्ती राजाभोज जंयतीदिनी समाजबांधवानी काढली विशाल महारॅली

## रॅलीमध्ये पारंपारीक वाजंत्रीसह खाचर आणि बैलबंडी हे आकर्षणाचे केंद्र ठरले





**गोंदिया :** पोवार समाजाचे आराध्य दैवत चक्रवर्ती सम्राट राजाभोज यांची जयंती वसंत पंचमी पर्वावर साजरी करण्यात येते. यंदाही १४ फेब्रुवारीला सम्राट राजभोज जयंती उत्सव समितीच्यावतीन वसंत पंचमीच्या पर्वावर शहरात पवार प्रगतीशील मंच गोंदिया, कुडवा, सुर्याटोला, फुलचूर, छोटा गोंदिया, मुर्री, दवनीवाडा, तिल्ली मोहगाव, रापेवाडा आदी ठिकाणाहून आलेल्या रॅलीचे जयस्तंभ चौकात स्वागत करण्यात आले. त्यानंतर १४ फेब्रुवारीला जयस्तंभ चौकातून या महारॅलीला जयस्तंभ चौकातून महॉरलीला शुभारंभ करण्यात आले. रॅलीला आमदार आमदार विजय रहांगडाले, कैलाशचंद्र हरीणखेडे, जि.प. अध्यक्ष पंकज रहांगडाले, जि.प. सभापती संजयसिंह टेंभरे, माजी खासदार खुशाल बोपचे, माजी आमदार हेमंत पटले, पं.स. सभापती मुनेश रहांगडाले, पवार प्रगतीशील मंच अध्यक्ष ॲड.पृथ्वीराज चव्हाण, राष्ट्रीय पवार क्षत्रिय महासभेचे संघटन सचिव खेमेंद्र कटरे, झामसिंग बघेले, पवार प्रगतीशिल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुरेश भक्तवर्ती, राजेश चव्हाण, सौ.धनिषा कटरे, महारॅली समिती अध्यक्ष पप्पू पटले, डॉ.प्रशांत कटरे आदींनी झेंडी दाखवून शुभारंभ केला.

जयस्तंभ चौक, गांधी प्रतिमा, दुर्गा चौक, गोरेलाल चौक मार्गे नेहरु चौकात रॅलीचे समापन करण्यात आले. गोंदियातील रस्त्यावर महारॅलीच्या निमित्ताने यावषी पोवार समाजाने सामाजिक शक्ती प्रदर्शन केले. गोंदिया तालुक्यातील हजारो पोवार समाजातील महिला पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या रॅलीमध्ये समाजातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या रॅलीमध्ये पारंपारीक वाजंत्रीसह खाचर आणि बैलबंडी हे आकर्षणाचे केंद्र ठरले होते. जयस्तंभ चौक, गांधीप्रतीमा, चादंणी चौक, गोरेलाल चौक मार्गक्रमण करीत रॅली नेहरु चौकात पोचली. त्याठिकाणाहून फुलचूर येथील रॅली फुलचूरकडे व मुरी येथील रॅली मुर्रीकडे रवाना करण्यात आले.

गोंदियात निघालेल्या चक्रवर्ती सम्राट राजाभोज जंयती महोत्सवानिमित्त महारॅलीत समाजबांधवानी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. या रॅलीत एड.टी.बी.कटरे, जितेश राणे, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष राधेलाल पटले, राजेश चव्हाण, राजेश राणे, संजय रहागंडाले, पं.स.सदस्य स्नेह गौतम, जय पटले, मनोज रहागंडाले, गोवर्धन बघेले, गुणराज ठाकरे, सुभाणराव रहागंडाले, राजेश अंबुले, मोनु पारधी, दुर्गाप्रसाद बिसेन, राजीव ठकरेले, बी.डब्लू.कटरे, अनिल टेंभरे, शिशिर कटरे, महेंद्र बिसेन, भागचंद रहागंडाले, प्रा. संजीव रहांगडाले, किशोर भगत, प्रीती देशमुख, सुरेश पटले, पकंज पटले, हेमंत बघेले, युगराज रहागंडाले, अनिल रहागंडाले, अजित टेंभरे, मुर्री येथील समितीचे अध्यक्ष पंकज टेंभरे, सचिव संदिप शरणागत, उपाध्यक्ष मनोज रिनायत,सदस्य मुकेश रिनायत, योगेश शरणागत, अशोक हरिणखेडे, भुवन रिनायत, उमेश पारधी, ओमप्रकाश पारधी, तिर्थराज रहागंडाले,विक्की बघेले, ओ.जे.बिसेन, शंकर पारधी, डॉ.पारधी, छत्रपाल तुरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

यशस्वीतेकरीता महारॅली उत्सव समितीचे अध्यक्ष राज–कुमार (पप्पु) पटले, पप्पू टेभंरे, उमेश पारधी, विक्की बघेले, प्रवेश बिसेन, दिनेश तुरकर, दीप्ति पटले, दुर्गाप्रसाद ठाकरे, संतोष पटले, दीपम देशमुख, बाबा बिसेन, पंकज पटेल, प्रवीण (बिट्टू) बिसेन, तिजेश गौतम, सचिन बोपचे, राहुल बिसेन, शोहिल कटरे, सहसचिव छत्रपाल चौधरी, ओम प्रकाश हरीणखेडे, संदीप तुरकर, शैलेश तुरकर, मुकेश पटले, गौरव हरीनखेड़े, दिनेश रहांगडाले, इंद्रकला ओमप्रकाश पारधी, सुरेश पटले, अजय रहांगडाले, ओमेश्वर (बाबा) चौधरी, बंटी बोपचे, ओम प्रकाश पारधी, मोनु रहागंडाले, अजय रहागंडाले, प्रवीण अंबुले, योगेश रहागंडाले, रोहित कटरे, चुनेश पटले, ओम रहांगडाले, पंकज चौधरी, रवि रिनायत, आशीष कटरे व नितिन कोल्हे यांनी सहकार्य केले.

रॅलीतील सहभागी समाजबांधवाकरीता दुर्गा कॅटर्स, संजू ठाकरे, भाजप, जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहागंडाले, आमदार विनोद अग्रवाल यांची जनता पार्टी, आदी मित्र परिवाराच्यावतीने नास्ता व पाण्याची सोय करण्यात आली होती.

# समाजासाठी झटण्याची जिद्द सर्वांनी अंगिकारावी–सभापती संजय टेंभरे




**गोंदिया:–** जिल्ह्यात बहुसंख्यांक असलेला आपला समाज अजूनही काही विशिष्ट समाजाच्या मानसिक गुलामगिरीत गुरफटून आहे. समाजात अनेक प्रतिभावंत आहेत, मात्र समाजासाठी योगदान देण्याची मानसिकता नसल्याने आजही आपल्या समाजाचा हवा तेवढा विकास झालेला नाही. त्यामुळे समाजाचा विकास करायचा असेल तर समाजासाठी झटण्याची जिद्द सर्वांनी अंगीकारणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे अर्थ व बांधकाम सभापती संजय टेंभरे यांनी केले.

क्षत्रिय चक्रवर्ती पोवार समाज संघटन फुलचुर च्या वतीने राजाभोज जयंती महोत्सव व पोवार समाज मिलन समार–ोह दिनांक १४ व १५ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आले होते. यावेळी १५ फेब्रुवारी रोजी आयोजित कार्यक्रमात ते उद्घाटक म्हणून बोलत होते.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून गोंदिया पंचायत समितीचे सभापती मुनेश रहांगडाले, पवार प्रगतिशील मंच अध्यक्ष ॲड. पृथ्वीराज चव्हाण, पंचायत समिती सदस्य स्नेहा गौतम, महिला समिती अध्यक्ष धनिषा कटरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राधाकृष्ण ठाकूर, डव्वा पोवार समाजाचे लिलेश रहांगडाले, ईशा गौतम, जिल्हा परिषद सदस्य अश्विनी पटले, अशोक हरिणखेडे, किरण ताई पटले, अंजू बिसेन,

### फुलचुर येथे चक्रवर्ती राजाभोज यांच्या जयंतीचे थाटात आयोजन

संतोष चौधरी, देवचंद बिसेन, सेलटॅक्स कॉलनी पोवार समिती अध्यक्ष एफ. सी. पटले, राहुल रहांगडाले, अनिता बिसेन, आनंद पटले, झामवांता बिसेन आदी उपस्थित होते.

सुरुवातीला चक्रवर्ती सम्राट राजाभोज यांच्या तैलचित्राला माल्यार्पण करुन कार्यक्रमाची विधिवत सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना समिती अध्यक्ष राजकुमार (पप्पू) पटले यांनी कार्यक्रमाच्या आयोजना संदर्भात सविस्तर माहिती दिली. यावेळी सभापती मुनेश रहांगडाले, पवार प्रगतिशील मंचचे अध्यक्ष पृथ्वीराज चव्हाण यांच्यासह इतरांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेश अंबुले यांनी तर आभारप्रदर्शन सुभानराव रहांगडाले यांनी केले.

त्यानंतर मा भगवती देवी जागरण ऑर्केस्ट्रा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक १५ फेब्रुवारी रोजी दुप–ारी महिलांसाठी संगीत खुर्ची व हळदीकुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आयोजक समिती अध्यक्ष राजकुमार (पप्पू) पटले, संघटन प्रमुख राजेश अंबुले, महारॅली प्रमुख सुभानराव रहांगडाले, यांच्यासह जय पटले, मनोज रहांगडाले, संजय चौधरी, भूपेंद्र बघेले, मनीष गौतम, मनीष बघेले, गोवर्धन बघेले, दुर्गाप्रसाद बिसेन, महेंद्र पारधी, सतीश गौतम, सुनील कटरे, संतोष पटले, गजानन बघेले, महेश कटरे, चंद्रकुमार अंबुले, संदीप येडे, राघव पटले, संतोष बिसेन, नाभिकमल चौधरी, राजकुमार पटले, सीताराम बिसेन, मोनू हरिणखेडे, प्रतीक बिसेन, गोपाल बिसेन, सुनील पारधी, लक्ष्मीप्रसाद पारधी, ऋषिपाल बिसेन, अनिल रहांगडाले, जयेश बिसेन, राकेश हरीणखेडे, आनंद येडे, धीरज कटरे, दिलीप बिसेन यांच्यासह इतर समिती सदस्यांनी सहकार्य केले.

# लंजे आश्रमशाळा सडक अर्जुनी येथे स्पेस ऑन व्हिल अंतराळाची महायात्रा



**सडक अर्जुनी:** विविध सहशा–लेय उपक्रमाअंतर्गत विज्ञान भारती व इसो बंगलोर तर्फे आयोजित फिरत्या अंतरिक्ष महायात्रा चे आयोजन दि.१० फेब्रुवारी शनिवारला लंजे आश्रमशाळा सडक अर्जुनी येथे आयोजन करण्यात आले होते. यात सडक अर्जुनी तालुक्यातील सर्व शाळांनी सहभाग घेऊन २३५९ विद्यार्थी व ९६ शिक्षकांनी अंतराळाविषयी माहिती जाणून घेतली.

या अंतरिक्ष महायात्रा चे उद्घाटन डी.वाय.चाटोरे, मुख्याध्यापक त्रीवेणी हायस्कूल सडक अर्जुनी व आर.वाय.कापगते, प्राचार्य अशोक लंजे कला व विज्ञान कनि.महा.आश्रमशाळा सडक अर्जुनी तसेच सर्व शाळांचे शिक्षकवर्ग व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत पार पडले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने रांगोळी स्पर्धा व पोस्टर स्पर्धा घेऊन विजेत्यांना विज्ञान भारती व इसोतर्फे पारीतोषीक व प्रमाणपत्र देण्यात आले. भारतीय अंतराळ संशोधन संस्था ने आतापर्यंत केलेल्या महत्वाचे संशोधन व उपक्रमाबाबत माहिती प्रदर्शन व व्हिडिओच्या माध्यमातून देण्यात आले. तसेच विज्ञानाविषयी विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण करण्याचे माध्यम ठरले. याचा विद्यार्थ्यांना निश्चितच फायदा होईल असे मार्गदर्शनातून सांगण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी के.के.पुस्तोडे मुख्या.दामाजी पाटील लंजे माध्य आश्रमशाळा सडक अर्जुनी, वाय.पी.बन्सोड, आर.एस.दोनोडे, पी.एच. गिऱ्हेपुंजे, की.जे.टी.बुराडे, एस.ए.राठोड, ई.एस.देशमुख, एम.एन.गहाणे व बी.एस. सूर्यवंशी यांनी मोलाचे सहकार्य केले.

**पान १ वरुन**– सरकार जे बोलतं ते करतं हे आंदोलनकर्त्यांनी समजून घेतलं पाहिजे.टिकणारं हे विधेयक आहे, असे एकनाथ शिंदे म्हणाले.**मागासवर्ग आयोगाच्या अहवालात काय?**

मराठा समाजाची लोकसंख्या राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या २८ टक्के असल्याचे आयोगाला आढळून आले आहे. सुमारे ५२ टक्के इतके आरक्षण असणाऱ्या मोठ्या संख्येतील जाती व गट आधीच राखीव प्रवर्गात आहेत. त्यामुळे, राज्यातील २८ टक्के असलेल्या अशा मराठा समाजाला इतर मागासवर्ग प्रवर्गात ठेवणे पूर्णपणे असमन्याय्य ठरेल. व्याप्तीच्या दृष्टीने, मराठा समाज, अधिक व्यापक असून त्याच्या अंतर्व्याप्तीच्या बाबतीत विभिन्न आणि याशिवाय त्याच्या वैशिष्ट्यांच्या बाबतीत प्रतिगामी आहे. या अर्थाने, मराठा समाजाचे मागासलेपण, अन्य मागासवर्गापेक्षा आणि विशेषतः, इतर मागासवगांपेक्षा विभिन्न व वेगळे आहे. आयोगाला, याद्वारे असे आढळून आले आहे की, अनुच्छेद ३४२क तसेच अनुच्छेद ३६६ (२६ग) यांमध्ये केलेल्या संविधान सुधारणांनुसार, हा समाज, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गामध्ये ठेवण्याची आणि इतर विद्यमान राखीव प्रवर्गापेक्षा एखाद्या विभिन्न व वेगळ्या प्रवर्गात, ठेवण्याची गरज असलेला वर्ग आहे.मराठा समाजाला शैक्षणिक आरक्षण आवश्यक आहे कारण,आर्थिक मागासलेपणा हा शिक्षणातील सर्वात मोठा अडथळा आहे.

अपुरे शिक्षण हे, बऱ्याचदा गरिबीला कारणीभूत ठरते. निरीक्षणातून आयोग अशा निष्कर्षावर पोहोचला आहे की, दुर्बल मराठा वर्गाचा, उत्पन्नाचा प्राथमिक स्रोत, शेती असल्यामुळे आणि प्रत्येक वर्षागणिक हा स्रोत कमी–कमी होत असल्यामुळे, त्याला, दशकानुदशके आत्यंतिक दारिद्र्य सोसावे लागत आहे.मराठा समाजाला नोकऱ्यांमध्ये आरक्षण आवश्यक आहे कारण, दारिद्र्य रेषेखाली असलेली व पिवळी शिधापत्रिका असलेली मराठा कुटुंबे, २१.२२ टक्के इतकी आहेत तर, दारिद्र्य रेषेखाली असलेली खुल्या प्रवर्गातील कुटुंबे, १८.०९ टक्के इतकी आहेत. मराठा कुटुंबाची टक्केवारी, राज्याच्या सरासरीपेक्षा (१७.४ टक्के) अधिक असून ते आर्थिकदृष्ट्या मागासलेले आहेत. निरक्षरता व उच्च शिक्षणाचा अभाव यांमुळे मराठा वर्ग, ज्या नोकऱ्यांमुळे त्याला समाजात काही स्थान मिळू शकेल अशा प्रतिष्ठित नोक–यांमध्ये व रोजगारामध्ये प्रवेश करू शकलेला नाही.

# शिवाजी संकुलमध्ये शिवजयंती सोहळा उत्साहात साजरा



**देवरी:** शिवाजी महाराजांचे चरित्र सर्वांसाठी प्रेरणादायी असून पन्नास वर्षाच्या आयुष्यामध्ये असंख्य पिढ्यांना आदर्श ठरणारे शिवरायांचे चरित्र प्रेरणादायी ठरते. बहुजनांच्या कल्याणासाठी झटणारा राजा महाराष्ट्रात निर्माण होणे संपूर्ण देशाचे भाग्य आहे. असे प्रतिपादन राजकुमार बडोले यांनी स्थानिक छत्रपती शिवाजी संकुलमध्ये दिनांक १९ फेब्रुवारी २०२४ रोज सोमवारला छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती उत्सव सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमाप्रसंगी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गोंदिया जिल्ह्याचे माजी पालकमंत्री राजकुमार बडोले हे होते. प्रमुख वक्ते व मार्गदर्शक प्रवीण देशमुख, माजी आमदार संजय पुराम, गोंदियाचे पोलिस अधीक्षक निखिल पिंगळे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक नित्यानंद झा, देवरीच्या पंचायत समिती सभापती अंबिकाताई बंजार, नगराध्यक्ष संजय उईके, कृष्णा सहयोगी तंत्र शिक्षण संस्थेचे अध्यक्ष झामसिंग येरणे, उपाध्यक्ष डॉ. सुनिल येरणे, सचिव अनिल येरणे, भाजपचे विरेंद्र अंजनकर आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे उद्घाटक निखिल पिंगळे यांनी, आजच्या घडीला विद्यार्थ्यांनी स्पर्धा करायची असेल तर प्रथम स्वतःशी स्पर्धा करावी नंतर शिक्षकांशी स्पर्धा करावी आणि केस वाढवून देवानंद होण्यापेक्षा ज्ञानार्जन करुन स्वामी विवेकानंद यांच्या सारखे स्वतःचे व्यक्तिमत्त्व घडवावे,असे प्रतिपादन केले.

तसेच प्रमुख वक्ते प्रवीण देशमुख यांनी आपल्या मार्गदर्शनातून आजच्या पिढीने आपल्या देशाचा इतिहास विसरुन चालणार नाही. या देशातील महामानवांचे चरित्र प्रत्येकांनी वाचावे. छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र प्रत्येकांनी वाचावे. शिवरायांच्या चरित्रातून आपल्याला प्रचंड प्रेरणा मिळते. शिवचरित्राची ज्योत सर्वांच्या काळजात नेहमी तेवत ठेवावी.असे प्रतिपादन केले.

दरम्यान, देवरीचे प्रकल्प अधिकारी विकास एस. राचेल–वार, डॉ. श्री. दिपक धुमणखेडे या सत्कारमूर्तींचे स्वागत व सत्कार यासह वर्ग १०वी व १२ वी मध्ये तालुक्यातून प्रथम व द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या व या वर्षीपासून प्रथमच सीबीएसई दहावी बोर्डाच्या परीक्षेमध्ये प्रथम व द्वितीय क्रमांक पटकाविणाऱ्या विद्यार्थ्यांच्या त्यांच्या पालकासह स्वागत व सत्कार करण्यात आला. याप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जिवनातील महत्वपूर्ण घटनांवर आधारित विद्यार्थ्यांनी रंगारंग सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनिल येरणे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. सुनिल येरणे यांनी केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. एस.टी.मेश्राम व कु.मनिषा भालेराव यांनी केले.

# शिवरायांचे शिवविचार घराघरात मनामनात रुजवा:आमदार मनोहर चंद्रिकापुरे



**अर्जुनी मोरगाव:** अखंड हिंदुस्थानाचे आराध्य दैवत स्वराज्य संस्थापक, रयतेचे राजे, कुशल प्रशासक, अफाट सामर्थ्यवान, शौर्य, पराक्रमी, कीर्तिवंत राजे शिवरायांचा आज जन्म दिनानिमित्त प्रत्येकानी शिवरायांचे शिवविचार घराघरात, मनामनांत रुजवावे.तेव्हा खऱ्या अर्थाने शिवराज्याची निर्मिती होईल असे विचार अर्जुनी/मोर.विधानसभा मतदारसंघाचे आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांनी व्यक्त केले.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने सोमवारी स्थानिक राष्ट्रवादी काँग्रेस कार्यालयात शिवजन्मोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अध्यक्षस्थानी आमदार मनोहर चंद्रिकापुरे होते. ते पुढे म्हणालेत की, आज चार शतकापूर्वीची परिस्थिती अत्यंत खडतर स्थितीत शिवरायांचा जन्म झाला. त्यावेळी जिजाऊ मातेच्या प्रेरणेने शिवरायांचे विचार शितिजापलीकडील होते. सर्वधर्म समावेशक, बहुजन प्रतिपालक होते. घराघरात शिवजयंती साजरी करुन आपल्या पिढीला शिवविचार रुजवावेत असे मत व्यक्त केले. यावेळी मार्गदर्शन करताना दुर्योधन मैंद म्हणालेत की, शिवरायांच्या छायेखाली कधीच नव्हती वाण. छत्रपती शिवराय हे बुद्धीप्रामाण्यवादी, विज्ञानवादी होते. याचे अनेक दाखले शिवचरित्रात पाहावयास मिळतात. त्यांनी कधी भविष्य, पंचांग, मुहूर्त पाहून कार्याला सुरुवात केली नाही. शिवरायांना परस्त्री माते समान होती. म्हणून त्यांनी जिजाऊंचा आदर्श घेऊन मातृसत्ताक पद्धती अवलंबिले होती. अशा लोककल्याणकारी राज्याला मानाचा मुजरा अर्पण केला.

यावेळी कार्यक्रमाला भोजराम रहिले, शालिक हातझाडे, उद्धव मेहेंदळे, नरेंद्र रंगारी, रतीराम राणे, नाशिक शहारे, डॉ दीपक रहिले, नानाजी पिंपळकर, पिंटू जिवानि, राकेश जैस्वाल, विजय आरेकर, राजू मेश्राम, सुशीला हलमारे, निशा मस्के, माधुरी पिंपळकर, अनीसा पठाण, सुन–ीता जैस्वाल, योगिराज हलमारे, देवानंद नांदेस्वर, विकास रामटेके आदी उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास तरुण पिढीपर्यंत पोहोचला पाहिजे–डॉ.परिणय फुके




**गोंदिया:** १९ फेबुवारी– छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मनोहर चौकात श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या नवनिर्मित १३ फूट उंच अश्वारूढ पुतळ्याच्या लोकार्पण सोहळ्याला पोहोचलेले जिल्ह्याचे माजी पालकमंत्री डॉ.परिणय फुकेनी, शिवरायांना अभिवादन करुन युवा पिढीला एक उत्साही संदेश दिला..

माजी पालकमंत्री डॉ.फुके म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज हे कोणत्याही जाती धर्माचे नसून सर्व समाजाचे महान व्यक्तिमत्व होते. सर्वांना सोबत घेऊन आणि १२ बलुतेदारांना घेऊन त्यांनी हे साम्राज्य उभारले. त्यांचे अंगरक्षक आणि सैनिक सर्व धर्माचे होते. आपण शिवाजी महाराजांचे केवळ जयंतीदिनीच नव्हे तर वर्षभर स्मरण केले पाहिजे. हे नाव घेतल्यानेच आपल्याला उर्जेची अनुभूती येते.

या जयंतीच्या माध्यमातून आम्ही आज चांगली सुरुवात केली आहे. समाजातील आदित्य सावंत यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा समाजाला अर्पण करुन गोंदियाचे नाव उंचावले आहे. फुके म्हणाले की, छत्रपती शिव–ाजी महाराजांचा पुतळा बसवताना अनेक अडथळे निर्माण झाले होते, ते सर्व अडथळे दूर करुन पुतळा बसविण्याचा प्रयत्न आम्ही समाजाच्या माध्यमातून केला. ही जागा अद्यापही शासनस्तरावर हस्तांतरित झालेली नाही. येत्या ६–७ दिवसांत ही जागाही आमची होईल, याची खात्री देतो.


जयंती सोहळ्यात स्मारकाचे उद्घाटन व श्री छत्रपती शिव–ाजी महाराज चौक या परिसराचे नामकरण करणाऱ्या फलकाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी समाजातील अनेकांचा श्री.फुके यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष अशोक इंगळे, जिल्हा उपनिबंधक मुकुंद पवार, आदित्य सावंत, गजेंद्र फुंडे, अपर तहसीलदार विशाल सोनवणे, तहसीलदार समशेर पठाण, एड राजा बढ़े, माधुरीताई नासरे, द्वारकाताई सावंत, मंजू कटरे, शीतलताई रहांगडाले, सुनीताताई माने, शीलाताई सावंत, वैशालीताई सावंत, श्री रमादे, निलाताई ढोक, सुनील केलंनका, दिपक कदम,राजेंद्र जगताप, राजू भाऊ, राजा कदम, महेंद्र बधे, अमृत इंगळे, सीमाताई बधे, सुवर्णा कदम, मीनाताई तुपकर, पुष्पा पवार, मंजूताई वाघ, आरती सावंत, शीतल इंगळे, स्नेहताई कदम, दत्ता सावंत, आकांशा पवार, अनंत जगताप, भावना–ताई कदम, प्रतिक कदम, सागर कदम, अनूप माणिकपुरे, अजिंक्य इंगळे यांच्यासह अनेक समाज बांधव उपस्थित होते.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायक्षेत)

# भूदान मंडळाने दिलेल्या शेतजमिनींवर घरे

**गोंदिया:** सरकारच्या दुर्लक्षामुळे भूदान यज्ञ मंडळाने शेतीसाठी दिलेल्या शेतजमिनीची अफरातफर करण्यात आली. आचार्य विनोबा भावे यांचे भूदान चळवळीच्या यशस्वी संघर्षाची वाताहत करण्यात आली. सरकारने हा उद्दिष्ट कायम ठेवण्याकरिता सातबारा उताऱ्यामध्ये भूदानधारक अशा नोंदसोबतच भूदान अहस्तांतरणीय करुन ज्या जमिनी विकसित करण्यात आल्या. त्या ताब्यात घेण्याची मागणी करण्यात आली.



पडीत व वजवीपेक्षा अधिक जमिनधारकांकडून भूमिहिनांना शेतीमध्ये पीक घेऊन जनतेचे पोषण व्हावे म्हणून आचार्य विनोबा भावे यांनी भूदान चळवळ उभी केली होती. या चळवळीमुळे सरकारला त्यांच्या मागण्या मान्य कराव्या लागल्या. भूदान यज्ञ मंडळाची स्थापना करण्यात आली. आपल्या क्षेत्रात अशी कित्येक हेक्टर जमीन प्राप्त झाल्यानंतर भूमिहिनांना त्यांच्या सहमतीने भूदान यज्ञ मंडळाकडून शेतजमिनीमध्ये पीक घेण्यास वाटप करण्यात आले. वाटप केलेल्या शेतजमिनीचे शसकीय रेकॉर्डवर नोंद घेण्यात आली. त्यांची ७/१२ उताऱ्यामध्ये भूदानधारक म्हणून व्यक्तींची नोंद करण्यात येत आहे. परंतु, सध्या स्थितीमध्ये अशा वाटप केलेल्या शेतजमिनीवर कित्येक जमीनधारक पीके घेत नाही.

### शासनाच्या दुर्लक्षामुळे वाताहत

**जमिनीवर शासनाच्या दुर्लक्षामुळे घरे, अवैध मालकी, रोड,तलाव, इमारती आदींच्या कामात आणण्यात आली आहे. आचार्य विनोबा भावे यांनी आयुष्यभर उभ्या केलेल्या यशस्वी संघर्षाची वाताहत करण्यात आली. ही एकंदर परिस्थिती शासनाच्या दुर्लक्षामुळे झाली आहे. शासनाने ७/१२ उताऱ्यामध्ये भूदानधारक अशी नोंद करताना भूदान अहस्तांतरणीय अशीसुद्धा नोंद करण्याचे शासकीय आदेश आहे. परंतु याकडे शासनाने दुर्लक्ष केल्यामुळे अशी जमीन शेतीकरिता राहिली नाही. त्या ठिकाणी अवैध मालकी, खासगी इमारत, रस्ते, तलाव इत्यादी गैरप्रकार दिसून येत आहे. यावर शासनाने तातडीने लक्ष देऊन आचार्य विनोवा भावे यांचे उद्दिष्ट कायम ठेवावे. शासनाने याकडे काळजीपूर्वक लक्ष द्यावे, भूदान जमिनीची अवैध विल्हेवाट बंद व्हावी अशी मगणी होत आहे.**

# वनकायदा समोर करुन रस्त्याचे काम बंद

### ७ वर्षापासून अडले बांधकाम: आर्थिक देवाण-घेवाण न झाल्याने काम थांबविले

**गोंदिया:** अर्जुनी मोरगाव तालुक्यातील कोहलगव ते गोठणगाव रोडाचे काम मागील ७ वर्षापासून वन कायद्याच्या नावाखाली सुरु असलेल्या स्त्याचे बांधकाम अर्धवट ठेवले आहे. त्यामुळे या रस्त्यावर नेहमी अपघात घडत आहेत. मार्ग उपविभागीय अधिकारी अर्जुनी मोरगाव अंतर्गत येत असून या मार्गाकडे सार्वजनिक बांधकाम विभाग व लोकप्रतिनिधी यांनी दुर्लक्ष केले असल्याचे दिसते.



कोहलगाव ते गोठणगाव या मार्गावर ११ किमी जंगल भाग असून रस्त्याच्या बांधकामासाठी सात वर्षाआधी १६ कोटी रुपये निधी मंजूर झला होता. परंतु हा मार्ग जंगलातून ५० वर्ष आधीपासून बनलेला असुनसुद्धा या मार्गाने साकोली, केशोरी, कुरखेडा बससेवा सुरु आहे. मार्ग दोन्ही जिलह्यांना जोडणारा आहे. सात वर्षाआधी नवेगाव येथील वनविभागातील प्रकाष्ठ उपविभागीय अधिकारी यांनी सार्वजनिक बांधकाम विभागालु बांधकाम थांबविण्यासाठी नोटीस देऊन रोडाचे काम बंद करण्यात आले होते. कोहलगाव ते गोठणगाव या मार्गावर अनेक अपघात घडले असून जीव सुद्धा गेले आहेत. तर काहींना अपंगत्व आले आहे. वनविभाग, लोकप्रतिनिधी व सार्वजनिक बांधकाम विभाग अजून किती लोकांचा बळी घेणार असे या परिसरातील नागरिष बोलत आहेत. कोहलगाव ते गोठणगाव धरण ८० वर्षाआधी या मार्गाचे रुंदीकरण करुन रोडाचे काम झाले होते. पण आता या रोडाचे बांधकाम बंद करण्यासाठी वनविभागाने कायदा का आड आणला? असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत.

### नागरिकांनी प्रश्न केला उपस्थित

**वनविभागातील काही अधिकारी बांधकाम विभागातील कंत्राटदाराकडून आथिक देवाण-घेवाण न झाल्याने स्वत:ला कर्तव्यदक्ष व कर्तबगार असल्याचे दाखवून वनकायदा समोर करुन काम बंद करतात याबद्दल आश्चर्य व्यक्त करीत आहेत. पण याच वनविभागातील अधिकाऱ्यांनी २०१८ मध्ये सुकळी ते गोठणगाव जंगलामध्ये कालीमाटी जंगलात उभे सागवन झाडे ५ ते ६फुट गोलाईचे झाडे मुळासकट कापून सहा शौचालयाचे बांधकाम केले आहेत. आजही या जंगलात बांधकाम सुरु आहे. वन कायदा कोठे आहे आणि कोणासाठी आहे?असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.**

### तेव्हा कुठे होता कायदा?

**सार्वजनिक बांधकाम विभाग व वनविभागाकडे कोहलगाव टी पाईंट ते पवनी चिचगड मार्ग पवनी वरुन २५ किमी चिचगड पर्यंत रस्त्याच्या दोन्ही कडेला राखीव जंगल अभयारण्य व व्याघ्र प्रकल्पाचे जंगल, पहाड असून या मार्गाचे रुंदीकरण करण्यात आले. त्यावेळेस वन कायदा नव्हाता काय?त्यावेळी या कामासाठी वन कायदा आड का आला नाही?असा सवाल उपस्थित करण्यात येत आहे.**

# ग्रामपंचायतच्या अधिकारावर जिल्हा परिषद सदस्याचे अतिक्रमण

### प्रकार त्वरित थांबविण्याची मागणी: अन्यथा तीव्र आंदोलन



**तिरोडा:** स्वच्छ भारत मिशन, दलित वस्ती, तांडा वस्ती, नरेगा व इतर कामे जे ग्रामपंचायतींच्या अधिकारात आहेत अशा कामांची प्रशासकीय मंजूरी काही जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य हे ग्रामपंचायतच्या पदाधिकाऱ्यांना विश्वासात न घेता पंचायत समिती कायालयातून घेऊन जातात. हे एक प्रकारे ग्रामपंचायतच्या अधिकारावर गदा आणणे आहे. त्यामुळे हा प्रकार त्वरित न थांबविल्यास या विरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा सरपंच संघटनेने दिला आहे.

तिरोडा तालुक्यातील सरपंच संघटनेची सभा गुरुवारी (दि.१५) पंचायत समितीच्या सभागृहात संघटनेचे अध्यक्ष विनोद लिल्हारे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या सभेला तिरोडा तालुक्यातील सरपंच संघटनेचे सचिव शिशुपाल रहांगडाले, कोषाध्यक्ष श्यामराव बिसेन, निशा बावनकर, लक्ष्मी ठाकरे, प्रिती भांडारकर, झेगेकर, सुरेंद्र नागपुरे, प्रकाश ठाकरे, शिवकुमार शेंडे, स्वाती चौधरी, शरणागत, कांबळी, मार्गदर्शक राजू चामट व सरपंच उपस्थित होते.

या बैठकीत सरपंच संघटनेच्या विविध मागण्यांबाबत आ.विजय रहांगडाले यांना निवेदन देऊन त्यांच्यासह चर्चा करण्याचा निर्णय घेण्यात आला. सभेत विविध विषयांवर सविस्तर चर्चा करुन सर्वानुमते अनेक विषयांवर ठराव मंजूर करण्यात आले. संचालन संघटनेचे प्रसिद्धी प्रमुख धादरीचे सरपंच अजितकुमार ठवरे यांनी केले.

### आदिवासी विकास मंत्री डॉ.विजयकुमार गावित यांचा गोंदिया जिल्हा दौरा कार्यक्रम

**गोंदिया :** राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित हे बुधवार २१ फेब्रुवारी २०२४ रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

मुंबई येथून सकाळी ७.१० वाजता नागपूर विमानतळ येथे आगमन व शासकीय वाहनाने कचारगड ता.सालेकसा कडे प्रयाण. दुपारी १२ वाजता कचारगड येथे आगमन व पारी कोपार लिंगो माँ काली कंकाली देवस्थान येथे भेट.



दुपारी १२.३० वाजता कचारगड येथून शासकीय वाहनाने सालेकसा कडे प्रयाण. दुपारी १ वाजता सालेकसा येथे आगमन व आदिवासी लाभार्थी मेळाव्यास उपस्थिती. दुपारी २.३० वाजता सालेकसा येथून शासकीय वाहनाने पुराडा कडे प्रयाण. दुपारी ३.१५ वाजता पुराडा येथे आगमन व माजी आमदार संजय पुराम यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट. दुपारी ४ वाजता पुराडा येथून शासकीय वाहनाने देवरी कडे प्रयाण. दुपारी ४.३० वाजता देवरी येथे आगमन व आदिवासी लाभार्थी मेळाव्यास उपस्थिती. सायंकाळी ६ वाजता देवरी येथून शासकीय वाहनाने कुरखेडा जि.गडचिरोली कडे प्रयाण.

# नवनिर्मित महामार्गाला तडे

**गोंदिया:** नव्याने घोषित करण्यात आलेल्या राष्ट्रीय महामार्गावरील गोंदिया ते कोहमारा दरम्यान १२ किलोमीटर अंतराचे बांधकाम २०१८-१९ मध्ये सुरु करण्यात आले. आता याच मार्गावरुन समृद्धी महामार्ग जाणार आहे. मात्र अद्यापही ते काम पूर्णत्वास आले नाही. असे असताना ठिकठिकाणी नवनिर्मित रस्त्याला भेगा पडल्या. सुरुवातीपासूनच बांधकाम करणाऱ्या एजंसीने दुर्लक्षितपणाचा कळस गाठला. मात्र याकडे संबंधित यंत्रणेचे अद्यापही लक्ष गेले नसल्यामुळे महामार्ग बांधकाम विभागाचेच कंत्राटदाराला अभय तर नाही? अशी शंका उपस्थित करण्यात येत आहे.



रस्त्यांमुळे दळणवळणाची सोय होऊन या माध्यमातून त्या भागाचा विकास होतो. ही बाब लक्षात घेता केंद्रीय भूपुष्ट वाहतूक तथा बांधकाममंत्री नितीन गडकरी यांनी जिल्ह्याला दोन राष्ट्रीय महामार्ग दिले. त्यातील गोंदिया ते कोहमाा मार्गावरील फुलचूर ते गोरेगाव दरम्यान १२ किलोमीटर अंतराचे सिमेंट क्रांक्रिट बांधकाम जगताप कन्स्ट्रक्शन कंपनीच्यावतीने २०१८-१९ मध्ये सुरु करण्यात आले. बांधकाम करणाऱ्या एजन्सीने सुरुवातीपासूनच कामात हयगय केली. त्यामुळे नागरिकांकडून अनेकदा विरोध करण्यात आला. ५ वर्षे लोटून देखील अद्याप कोहमारापर्यंत बांधकाम झालेले नाही. त्यातच ढिमरटोली, तुमखेडा ते गोंदिया दरम्यान ठिकठिकाणी नवनिर्मित बांधकामाला तडे पडले. परिणामी बांधकामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहे.

**बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष**

राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांच्या लक्षात हा प्रकार का येत नाही?असाही सवाल उपस्थित होत आहे. आता मुंबई ते नागपूरपर्यंत तयार झालेला समृद्धी महमार्ग गोंदिया गडचिरोलीपर्यंत विस्तारित करण्यात आला. याच मार्गाने समृद्धीचा विस्तार होणार आहे. त्यामुळे हा रस्ता समृद्धी महामार्गाच्या कामी पडणार की पुन्हा दुसरे बांधकाम करावे लागणार? असा सवाल उपस्थित झाला आहे.

### भाविकांची गैरसोय होणार नाही याची काळजी घ्या-खासदार नेते

**गोंदिया:** पारी कुपार लिंगो माँ कली कंकाली यात्रा कचारगड येथे पाच दिवस साजरी केली जाणार आहे. या यात्रेत मोठ्या प्रमाणात भाविक भक्त येणार असून त्यांची गैरसोय होता कामा नये अशा सूचना खासदार अशोक नेते यांनी प्रशासनाला दिल्या.कचारगड येथे आढावा सभा घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते.

जिल्हाधिकारी प्रजित नायर, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम, जिल्हा पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, उपविभागीय अधिकारी सत्यम गांधी, अपर पोलीस अधीक्षक नित्यानंद झा, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे व कचारगड देवस्थान समितीचे अध्यक्ष दुर्गाप्रसाद कोकोडे उपस्थित होते. कचारगड यात्रेचे आयोजन २२ फेब्रुवारी ते २६ फेब्रुवारी २०२४ दरम्यान (५ दिवस) करण्यात आलेले आहे.

# पर्यटन विकासनिधीमुळे पर्यटनाला चालना-आ.विजय रहांगडाले



**तिरोडा:-** प्रादेशिक पर्यटन विकास निधी अंतर्गत तिरोडा गोरेगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय रहांगडाले यांच्या माध्यमातून चोरखमारा पर्यटन क्षेत्र येथे २५०.०० लक्ष रुपये मंजूर करण्यात आले असून यामध्ये बघेले असोसिएट गुपतर्फे डिसाइन करुन उद्यान, रस्ते, स्वच्छतागृह, विजसुविधा, खेळाचे मैदान, सभागृह बांधकाम अशा विविध विकासकामांचे बांधकाम होणार असून सदर कामांचे भूमिपूजन आमदार महोदयांच्या हस्ते नुकतेच संपन्न झाले.

यावेळी प्रामुख्याने जी.प.सदस्या सौ.तुमेश्वरी बघेले, सौ.रजनीताई कुंभरे, कृउबास सभापती श्री जितेंद्र रहांगडाले, आर्किटेक्चर संदीप बघेले, प.स.सभापती सौ.कुंता पटले, प.स.सदस्य सौ.दिपाली टेंभेकर, कृउबास संचालक मिलिंद कुंभरे, चोरखमारा सरपंचा सौ. कल्पना दहिकर, भजेपार सरपंच डॉ. शिशूपाल रहांगडाले, डॉ. तारेंद्र बिसेन सदस्य , वडेगाव सरपंच शामराव बिसेन, व चोरखमारा शिव मंदिर कमिटीचे अध्यक्ष शोभेलाल दहीकर, सचिव मंगल बिसेन , तारेन्द्र बिसेन, ग्रा.प.सदस्य निरज असाटी, जगदीश टेंभरे, धरम बोपचे, उपस्थित होते.

# कॉपीमुक्त परीक्षांसाठी सर्वांनी दक्ष रहावे-प्रजित नायर

**गोंदिया:** विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी कॉपीमुक्त परीक्षा आवश्यक असल्याने सर्व यंत्रणांनी यासाठी दक्ष रहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी केले आहे. गोंदिया जिल्ह्यातील इयत्ता १० वी /१२ वी परीक्षा केंद्र संचालक, परिरक्षक यांच्या बैठकीत मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. यावर्षी परीक्षा पारदर्शी व निर्भय वातावरणात होण्यासाठी मागील वर्षभरापासून सातत्याने सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे सर्वांनी तत्परतेने व कर्तव्य कठोरपणे अंमलबजावणी करावी असेही ते म्हणाले. परीक्षेतील गैरप्रकारांना खतपाणी घालणाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.



जिल्हा पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे यांनी यावेळी मार्गदर्शन करतांना अनेक उदाहरणे देऊन प्रभावी मार्गदर्शन केले. कॉपी म्हणजे शिक्षण व्यवस्थेला लागलेली कीड आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार करुन कॉपीमुक्त परीक्षा हे अभियान यशस्वी करावे. विद्यार्थी व पालक यांना विश्वासात घेऊन परीक्षेचा ताण कमी करण्यासाठी पुढाकार घ्यावा.

सुरुवातीला शिक्षणाधिकारी (माध्यमिक) कादर शेख यांनी या दोन्ही परीक्षा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी डायटचे प्राचार्य डॉ. रमेश राऊत, उपशिक्षणाधिकारी श्री. दिघोरे, सर्व गटशिक्षणाधिकारी उपस्थित होते.

# कु.तुलसी रोकडे हिचे जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत यश



**गोरेगाव:-** जल जीवन मिशन जिल्हा परिषद गोंदिया यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय वक्तृत्व करंडक स्पर्धेत स्थानिक पी डी राहांगडाले विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय गोरेगाव येथील वर्ग अकरावी कला विभागाची कु. तुलसी राजकुमार रोकडे या विद्यार्थिनीने या स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवून ५५००रु व प्रमाणपत्र असे पारितोषिक पटकावले आहे.

तिच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ.टी.पी.येडे, सचिव ॲड. टी.बी.कटरे, संचालक यू.टी. बिसेन, प्राचार्य सी.डी. मोरघडे, पर्यवेक्षक ए.एच.कटरे, मार्गदर्शन शिक्षक सी.आर.बिसेन, डी.बी.चाटे व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.


## ग्रामपंचायत-परसोडी/रै

**पंचायत समिती-अर्जुनी/मोर, जिल्हा गोंदिया**

Email ID-parsodiraigp@rediffmail.com दिनांक:-१५/०२/२०२४

**निविदा क्रं.१**

ग्रामपंचायत परसोडी रै अंतर्गत विवरणातील बांधकामाची निविदा महाराष्ट्र बांधकाम विभागाकडे यथायोग्य श्रेणीत पंजीबध्द असलेल्या कंत्राटदाराकडून शेकडेवारी पध्दतीने ऑफलाईन मागवित आहे.

**कामाचे विवरण**

| अ.क्र. | कामाचे व योजनेचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | अनामत रक्कम | काम करण्याचा कालावधी | कोरी निविदा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | १५ वा वित्त आयोग पं.स.स्तर निधीमधून मौजा-चान्ना कोडका येथे श्री.गोविंदा गोमा भोयर यांचे घराजवळ हातपंप बनविने | १२००००/- | १२००/- | ६ महिने | ५००/- |

वरील निविदा प्रक्रीया २०/०२/२०२४ ला सकाळी १०.०० ते दिनांक २७/०२/२०२४ ला सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (सुटटीचा दिवस वगळून) या कालावधीत राबवण्यात येईल. सदर निविदा ही पुढील मासीक सभेत उघडण्यात येईल. सदर निविदेची तपशिलवार माहीती अटी व शर्तीसह ग्रा.पं.च्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध केलेली आहे.

**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत परसोडी/रै**

**प्रभारी सरपंच**
**ग्रामपंचायत परसोडी/रै**


### ३ मार्चला पल्स पोलिओ लसीकरण मोहीम

**गोंदिया:** भारत हा पोलिओमुक्त देश आहे. मात्र काही देशांमध्ये पोलिओ अजुनही आहे. त्यामुळे खबरदारी म्हणून पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे. आरोग्याच्या दृष्टीकोनातून देशात ० ते ५ वर्षातील बालकांना पोलिओ डोस देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तरी जिल्ह्यातील नागरिकांनी जागृत राहून आपल्या बालकांना पोलिओचा डोस आवश्य पाजा, असे आवाहन जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी केले.राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम ३ मार्च २०२४ रोजी राज्यात राबविण्याबाबत सूचना प्राप्त झालेल्या आहेत. त्याबाबत जिल्ह्यात जिल्हाधिकारी प्रजित नायर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय टास्क फोर्स समितीची सभा घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते.


## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, गोंदिया

**निविदा सुचना क्र.४० सन २०२३-२०२४ (त्रितिय मागणी)**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, विभाग गोंदिया मार्फत खालील दर्शविल्या प्रमाणे निविदा मागविण्यात येत आहे. सदर निविदेचा सविस्तर तपशील दि.२२/०२/२०२४ ते दि.२६/०२/२०२४ पर्यंत विभागीय कार्यालयात उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

१) मजीप्रा विभागीय कार्यालया अंतर्गत, कार्यकारी अभियंता विभाग गोंदिया करीता भाडेतत्वावर वाहन लावणेबाबतची कामे-**किंमत रू.६,३०,०००/-**

२) मजीप्रा विभागीय कार्यालया अंतर्गत उप विभाग क्र-१, गोंदिया करीता भाडेतत्वावर वाहन लावणेबाबतची कामे-**किंमत रू.५,०४,०००/-**

३) मजीप्रा विभागीय कार्यालया अंतर्गत उप विभाग क्र-२, गोंदिया करीता भाडेतत्वावर वाहन लावणेबाबतची कामे-**किंमत रू.५,०४,०००/-**

४)मजीप्रा विभागीय कार्यालया अंतर्गत उपविभाग क्र-३, गोंदिया करीता भाडेतत्वावर वाहन लावणेबाबतची कामे-**किंमत रू.५,०४,०००/-**

५) मजीप्रा विभाग कार्यालय अंतर्गत उप अभियंता (यांत्रिकी) विभाग गोंदिया करीता भाडेतत्वावर वाहन लावणेबाबतची कामे-**किंमत रू.५,०४,०००/-**

जिमाका/गोंदिया/जाहिरात/१३१/२०२४

**कार्यकारी अभियंता**
**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**
**विभाग, गोंदिया**





# गोंदिया जिल्हा परिषदेचा तुटीचा अर्थसंकल्प सादर

## शेतकरी योजनेकरीता ३५ लाखाची विशेष तरतूद

**गोंदिया :-** जिल्हा परिषदेचा सन २०२३-२०२४ चा सुधारीत २८ कोटी ८१ लाख ९५ हजार ३५३ रुपये व २०२४-२५ चा १६ कोटी ०४ लाख ४० हजार ४३८ रुपयांच्या संभाव्य खर्चाचा अर्थसंकल्प जि.प.अर्थ सभापती योपेंद्रसिह (संजय) टेंभरे यांनी (दि.१५) सभागृहात सादर केलां विशेष या अर्थसंकल्पात बळीराजाला मदत करण्याकरीता शेती सामग्री पुरवणे हे नवीन लेखाशिर्ष तयार करुन पहिल्यांदाच ३५ लाख रुपयाची तरतूद करण्यात आल्याची महत्वपूर्ण घोषणा जिल्हा परिषदेचे अर्थ सभापती टेंभरे यांनी केली.

अर्थसंकल्पात महिला बालकल्याण, समाजकल्याण, पाणी पुरवठा आणि कृषी विषयक योजनांवर तरतूद करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेची अर्थसंकल्पीय सर्वसाधारण सभा सोमवारी दुपारी १ वाजता जि.प.च्या स्व.यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करण्यात आली होती. जि.प.अध्यक्ष पंकज रहागंडाले यांच्या अध्यक्षतेखाली सभेला सुरुवात झाली. जि.प. बांधकाम तथा अर्थ सभापती संजय टेंभरे व मुख्य लेखा वित्त अधिकारी जनार्दन खोटरे यांनी सायकांळी ५ वाजता अर्थसंकल्प सादर केला.

यावेळी जिल्हा परिषद उपाध्यक्ष इंजि.यशवंत गणवीर, कृषी व पशुसंवर्धन सभापती रुपेश कुथे, महिला बालकल्याण सभापती सौ. सविता पुराम, समाजकल्याण सभापती सौ.पुजा सेठ, मुख्य कार्यकारी अधिकारी एम.मुरुगनथन, अति.मुख्य कार्यकारी अधिकारी तानाजी लोखंडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी जी.बी.खामकर यांच्यासह विभागप्रमुख उपस्थित होते.

या अर्थसंकल्पात समाज कल्याण, ग्रामीण पाणी पुरवठा, महिला व बाल कल्याण व दिव्यांग कल्याणासाठी भरीव निधीची तरतूद करण्यात आली. जिल्हा परिषदेचे वर्षातील सुधारित उत्पन्न २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात १९ कोटी ९६ लाख ७८ हजार ५४९ रुपये एवढे करण्यात आले. तर संभाव्य २०२३-२४ संभाव्य उत्पन्न ११ कोटी ३३ लाख ४२ हजार ९९९ रुपये निर्धारित करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे घड्याळी तासिकेवरील शिक्षक नियुक्तीकरीता सुधारित अंदाजपत्रकात १ कोटी रुपये तर २०२४-२५च्या संभाव्या अर्थसंकल्पात ३० लाख रुपयाची तरतूद करण्यात आली आहे. अटल क्रिडा स्पर्धेकरीता सुधारीत अंदाजपत्रकात ४० लाख रुपये तर सुधारित अंदाजपत्रकात १५ लाख रुपयाची तरतूद करण्यात आली आहे.

जिल्हा परिषदेच्या आर्थिक उत्पन्नात वाढ व्हावी याकरीता जिल्हा परिषद सदस्यांच्या मागणी-वरुन दुकानगाळे बांधकामाकरीता सुधारित अंदादपत्रकात ६० लाख रुपये तर २०२४-२५च्या संभाव्य अर्थसंकल्पात १.१० कोटी रुपयाची तरतूद करण्यात आली आहे. जि.प.सदस्यांच्या स्थानिक विकास निधीकरीता २०२४-२५ या वर्षाकरीता २ कोटी ६५ लाखाची तरतूद करण्यात आली आहे.



आरोग्य विभागाकरीता ३२ लाख ६४ हजार रुपये, समाजकल्याण विभाग, मागासवगीयांच्या कल्याणसााठी योजनेकरीता ७१ लाख ९१ हजार रुपयाची तरतूद करण्यात आली आहे. दिव्यांग कल्याणासाठी ५ टक्के निधी अंतर्गत २८ लाख २० हजार रुपयाची तरतूद करण्यात आली आहे. महिला बाल कल्याण विभागाकरीता १ कोटी २५ लाख ८ हजाराची तरतूद करण्यात आली आहे. कृषी विभागाकरीता ७० लाख ६७ हजार, पशुसंवर्धन विभागाकरीता ६१ लाख ८६ हजार, सामान्य प्रशासन विभागाकरीता २ कोटी २५ लाख ९० हजार, वित्त विभागाकरीता ८१ लाख ५१ हजार रुपये, पंचायत विभागाकरीता १५ लाख ३१ हजार, लघु पाटबंधारे विभागाकरीता ७० लाख ३ हजार रुपयाचा निधीची तरतूद या अर्थसंकल्पात करण्यात आल्याची माहिती सभापती टेंभरे व मुख्य लेखा वित्त अधिकारी जनार्दन खोटरे यांनी सभागृहाला दिली.

# तीन झेरॉक्स दुकानदारांवर कॉपीराईट अधिनियमांतर्गत कारवाई

**गोंदिया :** नवनीत या नामांकित कंपनीच्या प्रश्नसंचाचे मायक्रो झेरॉक्स काढून त्यांची विक्री करणाऱ्या झेरॉक्स दुकानदारांवर रामनगर पोलिसांनी कॉपीराईट अधिनियम उल्लंघनप्रकरणी कारवाई केली आहे. शुक्रवारी (दि. १६) रात्री करण्यात आलेल्या कारवायांत पोलिसांनी प्रश्नसंचांचे मायक्रो झेरॉक्स व झेरॉक्स मशीन असा एक लाख ४५ हजार ३०० रुपयांचा माल जप्त केला आहे.

शिक्षण क्षेत्रात नवनीत प्रकाशन ही एक नामांकित कंपनी असून, त्यांचे नवनीत २१ अपेक्षित प्रश्नसंच दहावी व बारावीतील विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी महत्त्वाचे ठरतात. नवनीत एज्युकेशन लिमिटेड कंपनी ही महाराष्ट्र राज्य कॉपीराईट कायदा १९५७ चे कलम ६३ अन्वये प्राधिकृत असून, दुसऱ्या कुणालाही नवनीत २१ अपेक्षित प्रश्नसंच प्रकाशित करण्याचा अधिकार नाही. असे असतानाही शहर आणि रामनगर परिसरातील काही झेरॉक्स दुकानदार या प्रश्नसंचांचे मायक्रो झेरॉक्स काढून त्यांची विक्री करीत असल्याची माहिती कंपनीचे रीजनल सेल्स मॅनेजर तक्रारदार किशोर प्रभाकर सेलुकर (वय ५८, रा. आर्णी रोड, यवतमाळ) यांना मिळाली होती. याबाबत त्यांनी पोलिस अधीक्षक निखील पिंगळे यांना कायदेशीर कारवाई करण्याकरिता रीतसर परवानगी मागून पोलिसांची मदत मिळण्याकरिता विनंती केली होती. यावर पोलिस अधीक्षक पिंगळे यांनी स्थानिक गुन्हे शाखा प्रभारी व शहर निरीक्षकांना तक्रारदार सेलूकर यांना मदत करुन कायदेशीर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या.

यावर स्थानिक गुन्हे शाखा आणि शहर पोलिसांनी वेगवेगळी पथके तयार केली होती. दरम्यान, शुक्रवारी (दि. १६) तक्रारदार सेलूकर व पोलिसांनी पाहणी केली असता त्यांना एन.एम.डी. कॉलेज रोडवरील शिव-ाणी झेरॉक्सचे मालक रविकांत हरिप्रशाद जायस्वाल (६०), रानी झेरॉक्सचे मालक उज्ज्वल तुषारकांत जायस्वाल (३४) व लक्ष्मी झेरॉक्सचे मालक चंद्र रमेश जोशी (३४) हे दुकानात इयत्ता दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षाकाळात उपयोगी येणाऱ्या नवनीत २१ अपेक्षित प्रश्नसंचाचे अवैधरीत्या मायक्रो झेरॉक्स प्रती काढून स्वतःच्या आर्थिक फायद्याकरिता नकलीकरण-बनावटी तयार करुन विक्री करीत असताना व बाळगताना मिळून आले.

तिघांनी कॉपी राईट ॲक्ट अधिकाराचे उल्लघंन केल्याने त्यांच्यावर कॉपी राईट अधिनियम १९५७ सुधारित अधिनियम १९८४ आणि १९९४ च्या कलम ५१, ६३, ६५ अन्वये रामनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक पिंगळे, अप्पर पोलिस अधीक्षक नित्यानंद झा यांच्या मार्गदर्शनात पोउपनि चणवार, पोलिस अंमलदार स.फौ. अर्जुन कावळे, हवालदार राजू मिश्रा, तुलसीदास लुटे, प्रकाश गायधने, सुजित हलमारे, शिपी कापसे, महिला शिपाई करोशिया यांनी केली आहे.



### मिळून आले १०५० मायक्रो प्रश्नसंच

**पोलिसांनी केलेल्या या कारवाईत त्यांना शिवाणी झेराक्समधून मायक्रो झेरॉक्स करुन ठेवलेले ४५० संच प्रत्येकी ३० प्रमाणे एकूण किंमत १३ हजार ५०० रुपये व मायक्रो झेरॉक्स काढण्याकरिता वापरती एक जुनी झेरॉक्स मशीन किंमत सुमारे ३५ हजार रुपये, रानी झेरॉक्स सेंटरमध्ये ४०० मायक्रो झेरॉक्स संच किंमत १२ हजार रुपये व २५ हजार रुपये किमतीची झेरॉक्स मशीन तसेच लक्ष्मी झेरॉक्स सेंटरमध्ये २०० मायक्रो झेरॉक्स संच किंमत सहा हजार रुपये व ७० हजार रुपये किमतीची झेरॉक्स मशीन मिळून आली. पोलिसांनी असा एकूण एक लाख ४५ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

# गाळामुळे जलसाठे धोक्यात

## पाण्याची पातळी खालावली: धरणांची क्षमता घटतेय, भविष्यात जलसंकटाचे संकेत

**गोंदिया:** धरणांमध्ये वर्षानुवर्षे गाळ साचतो आहे. परिणामी धरणांची जलधारण क्षमता कमी-कमी होत आहे. त्याचवेळी वाढती लोकसंख्या, वाढत जाणारे उद्योग यामुळे पाण्याचा वापरही वाढतो आहे. येणाऱ्या काळात पाण्याची मागणी वाढत जाणार हे निश्चित आहे. ही विरोधाभासी स्थिती लक्षात घेतल्यास भविष्यात पाण्याचे दुर्भीक्ष्य निर्माण होणार हे सांगण्यासाठी कुण्या ज्योतिष्याची गरज नाही. सूर्य तळपू लागताच बाष्पीभवन प्रक्रियेला वेग येतो. स्त्रोत खालावतात, त्यामुळे जलाशयांची पाणीपातळी खालावते. आज महाराष्ट्रातील २९९४ धरणात पाणीसाठा झपाट्याने कमी होताना दिसत आहे. फेब्रुवारीच्या मध्यातच धरणांतील पाण्याचा साठा चिंतेचा विषय ठरला आहे. नागपूर विभागातील १६ मोठ्या प्रकल्पांतील पाणीसाठा ४० टक्क्यांनी कमी झाला आहे. मागील वर्षी फेब्रुवारीत हाच साठा ७० टक्के होता. यंदा तो ५९ टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. भविष्यातील जलकंकट टाळायचे असल्यास धरणे गाळमुक्त केल्याशिवाय पर्याय नसल्याचे जल अभ्यासक मानतात. पुराचा धोका टाळता येईल. वेगवेगळ्या कारणांनी जमिनीची धूप होते. पावसाळ्यात वाहत्यापाण्यासोबत माती, रेती वाहून धरणात जमा होते. कोणतेही धरण बांधताना साचणाऱ्या गाळाचा पुर्वीच विचार केला जातो. मात्र, पुढे या माहितीचा काहीच उपयोग होताना दिसत नाही. गाळ वाढत गेल्यास जलधारण करण्याची धरणांची क्षमता कमी होते. यामुळे

**पूर्व विदर्भातील प्रकल्पांची स्थिती**

| प्रकल्प | जलसाठा (दलघमी) | सद्यस्थिती (टक्के) | गतवर्षी (टक्के) |
|---|---|---|---|
| नवेगाव खैरी | 75.89 | 53.45 | 71.97 |
| तोतलाडोह | 651.03 | 64.02 | 81.05 |
| वडगाव | 70.45 | 52.22 | 76.24 |
| नांद | 12.91 | 24.28 | 100 |
| खिंडसी | 67.33 | 65 | 24.37 |
| गोसेखुर्द | 365.32 | 49.36 | 44.47 |
| बावनथडी | 172.79. | 19 | 68.09 |
| आसोलामेंढा | 35.03 | 46.61 | 100 |
| इटीयाडोह | 219.99 | 69.21 | 97.09 |
| बोर | 61.98 | 48.64 | 78.50 |
| निम्न वर्धा | 139.90 | 64.51 | 56.85 |

पुरेशा क्षमतेने पाणी साठवता येत नाही आणि ते वाहून जाते. पुढे तेच पुरासाठी कारणीभूत ठरते.

**गाळ काढण्याकडे कायमच दुर्लक्ष**

जलाशयात साचत चाललेल्या वाढत्या गाळाचा त्याचे दोन प्रतिकूल परिणाम होतात. त्यातला सर्वात महत्वाचा म्हणजे धरणात पाणी साठवण्याची क्षमता कमी होते आणि पाण्याच्या दर्जावरही परिणाम होतो. ही बाब लक्षात घेऊनच मध्यंतरी सरकारने गंभीर भूमिका घेतली होती. धरणे गाळमुक्त आणि शिवार गाळयुक्त करण्याचा निर्णय घेतला गेला. पुढे मात्र हा उपक्रम थंडबस्त्यात गेला. धरणातील पाणी साठ्यापेक्षा गाळ जास्त होत चालला आहे. मृतसाठ्यापेक्षा २-३ पट गाळ धरणांमध्ये आहे. अनेक धरणांत गाळ काढण्यासाठी खालच्या बाजूला नदी पातळीच्या समांतर एक दार असते. दरवर्षी दार उघडून जमा झालेला गाळ नदीपात्रात सोडल्या जावा, अशी अपेक्षा आहे. पण ते नियमित उघडले गेले नसल्याने जाम झाले आहे. ज्यावेळी धरणातील पाणी कमी होते. मृत साठ्यावर धरण येऊन पोहोचते, अशावेळी या दरवाज्याचा वापर व दुरुस्ती करण्याचे कष्ट संबंधित विभाग घेत नाही. परिणामी हे दार असूनही नसल्यासारखेच असतात.



# आदिवासी लाभार्थी व विद्यार्थी पालक मेळावा आज

**गोंदिया :** प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय देवरी च्या वतीने बुधवार २१ फेब्रुवारी २०२४ रोजी शासकीय आश्रम शाळा जमाकुडो ता. सालेकसा येथे सकाळी ११.०० वाजता व एकलव्य मॉडेल रेसिडेन्शिअल स्कूल बोरगाव बाजार ता. देवरी येथे दुपारी ३.०० वाजता आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित यांचे प्रमुख उपस्थितीत आदिवासी लाभार्थी मेळावा तसेच विद्यार्थी पालक मेळावा याचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर मेळावा कार्यक्रमात एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प देवरी यांच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची माहिती देण्यात येणार आहे. आदिवासी शबरी घरकुल योजनेअंतर्गत सन २०२३-२४ मधील शबरी आदिवासी घरकुल मंजूर झालेल्या लाभार्थ्यांना लाभाचे वाटप करण्यात येईल. सन २०२२-२३ अंतर्गत केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेअंतर्गत लाभ दिलेल्या लाभार्थ्यांना लाभाचे अर्थसहाय्य बँक खात्यामध्ये वाटप करण्यात येणार आहे. आदिवासी शबरी वित्त विकास महामंडळ उपप्रादेशिक कार्यालय देवरी कार्यालय अंतर्गत सन २०२३ -२४ योजना अंतर्गत कर्ज योजना मंजुरी आदेश लाभार्थी व एपीओ केंद्रांना धनादेश वितरण करण्यात येणार आहे. सदर वाटप मंत्री विजयकुमार गावित यांच्या अध्यक्षतेखाली व पालकमंत्री धर्मरावबाबा आत्राम यांच्या हस्ते करण्यात येईल.

# कमी दृश्यमानातही बिरसी विमानतळावरुन होणार उड्डाण

## आयएलएस यंत्रणा लागली,डीसीजीसीएच्या प्रमाणपत्राची प्रतीक्षा: विमानतळ विस्तारीकरणास सुरुवात

**गोंदिया:** तालुक्यातील बिरसी विमानतळावर आयएलएस (इस्टुमेंट लॅण्डिंग सिस्टम) ही यंत्रणा कार्यान्वित नसल्याने या विमानतळावरुन कमी दृश्यमानात विमानाचे उड्डाण करता येत नव्हते. त्यामुळे मागील महिन्यात गोंदिया-हैदराबाद-तिरुपती या विमानसेवेत अडथडा निर्माण झाल्याने तब्बल आठ दिवस उड्डाण रद्द करण्यात आले होते. मात्र, आता आयएलएस ही यंत्रणा लावण्यात आली आहे.

त्यामुळे बिरसी विमानतळावरुन कमी दृश्यमानातही विमानाचे टेकऑफ आणि लॅण्डिंग करणे शक्य होणार असल्याचे बिरसी विमानतळ प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.



बिरसी येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ असून मागील वर्षी १ डिसेंबरपासून या विमानतळावरुन गोंदिया-हैदराबाद-तिरुपती या विमानेसेवला प्रारंभ करण्यात आला.

इंडिगो विमान कंपनीने या विमानतळावरुन ही विमानसेवा सुरु केली आहे. मात्र, हिवाळ्यात कमी दृश्यमानात या विमानतळावरुन आयएलएस यंत्रणेअभावी अडचण निर्माण झाली होती. तर ही यंत्रणा कार्यान्वित करण्यास बिरसी विमानतळाच्या विस्तारीकरणाची अडचण होती. बिरसी विमानतळाच्या परिसरात परसवाडा-कामठा मार्ग गेला असल्याने उड्डाणादरम्यान काहीशी अडचण निर्माण होत होती.

अखेर परसवाडा-कामठा हा मार्ग बंद करुन बिरसी विमानतळाच्या विस्तारीकरणाचे काम सुरु करण्यात आले आहे. त्यामुळे बिरसी विमानतळ प्राधिकरणाने रशियाहून आणलेली आयएलएस ही यंत्रणा बिरसी विमानतळावर लावण्यात आली. दिल्ली येथील डीजीसीएची चमू येऊन याची पाहणी करणार आहे. त्यानंतर त्यांच्याकडून प्रमाणपत्र मिळाल्यानंतर ही यंत्रणा कार्यान्वित केली जाणार असल्याचे बिरसी विमानतळ प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

### विस्तारीकरणाची कामे झाली सुरु

**बिरसी विमानतळ परिसरातून जाणार परसवाडा-कामठा हा मार्ग बंद करुन बिरसी विमानतळाच्या विस्तारीकरणाच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे. सध्या हे काम प्रगतीपथावर असून यामुळे प्रवासी विमानसेवेत वाढ व कार्गोसेवा सुरु करण्यास मदत होणार असल्याची माहिती सुत्रांनी दिली.**

### प्रवासी विमानेसवा सुरळीत सुरु

**बिरसी येथील विमानतळावरुन गोंदिया-हैदराबाद-तिरुपती ही विमानसेवा इंडिगोने सुरु केली. मागील दोन महिन्यांपासून ही सेवा सुरळीत सुरु असून याला प्रवाशांचा सुद्धा प्रतिसाद मिळत आहे. दररोज १४० प्रवासी या विमानतळावरुन ये-जा करीत असल्याची माहिती आहे.**

# जागृती मंच व व्यापारी संघटनेचे निदर्शने

**गोंदिया:** जागृती विकास मंच गोंदिया व व्यापारी चॅरिटेबल एसोसिएशन यांच्या संयुक्तवतीने वीज दरवाढ कमी करण्यात यावी तसेच रखडलेले जुन्या उड्डाणपुलाचे बांधकाम त्वरित सुरु करण्यात यावे. या मुख्य मागणीला घेऊन दि.१६ स्थानिक डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात जनआंदोलन व धरणा प्रदर्शन करण्यात आले.

महाराष्ट्रात इतर राज्याच्या तुलनेत वीज दर अधिक आहेत. त्यातही शासनाकडून दरवाढ कमी करण्याऐवजी त्यात विविध कर जोडून आणखी वीज दरवाढ केली जात आहे. यामुळे आजघडीला वीज दरवाढ ही अवाक्याबाहेर गेली आहे. मागील कित्येक दिवसांपासून वीज दरवाढ कमी कण्यात यावी, यासाठी जागृती विकास मंचच्यावतीने निवेदन देऊन शासन, प्रशासन स्तरावर पाठपुरावा करण्यात आला. परंतु कसलीही दखल घेण्यात आली नाही. यामुळे जागृती विकास मंच गोंदिया व व्यापारी चॅरिटेबल एसोसिएशन यांच्या संयुक्त वतीने धरना देवून जनआंदोलन करण्यात आले. दरम्यान उपविभागीय अधिकाऱ्यामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर करण्यात आले. यावेळी जागृती मंच व व्यापारी संघटनेचे सुरेंद्र शर्मा, संजय जैन, सुरज नशीने, लक्ष्मण लधानी, महेंद्र खंडेलवाल, शिशिर कटरे, दिव्या भगत, मैथिली पुरोहित, प्रफुल्ल जैसवाल, प्रतीक रामटेक्कर, आबिद शेख, रवि लधानी, रवि कनौजिया, राजेंद्र कवाडे, अजय जायस्वाल आदिंसह पदाधिकारी मोठ्या संख्येत सहभागी झाले होते.



# गोंदियासह राज्यात सहा ठिकाणी नर्सिंग महाविद्यालय

**गोंदिया:** राज्यात जळगांव, लातूर, बारामती, सांगली (मिरज), नंदुरबार व गोंदिया येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्न प्रत्येकी १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे शासकीय परिचर्या महाविद्यालय (नर्सिंग महाविद्यालय) सुरु करण्याचा निर्णय झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

राज्यात व देशामध्ये होणारा संसर्गजन्य आजाराचा फैलाव विचारात घेऊन परावैद्यकीय अभ्यासक्रमामध्ये आमूलाग्र बदल करण्याचे शासनाने ठरविले असून त्यादृष्टीने अशी नर्सिंग महाविद्यालये सुरु करण्यात येत आहे. या ६ शासकीय परिचर्या महाविद्यालयांकरिता पहिल्या चार वर्षांसाठी सुमारे १७३ कोटी ८८ लाख इतका खर्च करण्यात येईल. तसेच पाचव्या वर्षापासून प्रतिवर्ष सुमारे १३ कोटी ९९ लाख इतका निधी देण्यात येईल.

नंदुरबार व गोंदिया येथील परिचर्या महाविद्यालयांसाठी “Scheme for augmenting Nursing Education- Establishment of new Colleges of Nursing (CON) in co-location with Medical Colleges” या केंद्राच्या योजनेत प्रति परिचर्या महाविद्यालय रुपये १० कोटी इतका निधी देण्यात येईल. त्यापैकी केंद्र शासन ६० टक्के प्रमाणे रुपये ६ कोटी व राज्य शासन ४० टक्के प्रमाणे ४ कोटी निधी देणार आहे. बांधकाम, फर्निचर, यंत्रसामुग्री, मनुष्यबळ व दैनंदिन आवती खर्च इ.साठी प्रति परिचर्या महाविद्यालय ३२ कोटी ९७ लाख आवश्यक असून या खर्चासही मान्यता दिली आहे.

जळगांव, लातूर, बारामती व सांगली (मिरज) या परिचर्या महाविद्यालयांसाठी बांधकाम, फर्निचर, यंत्रसामुग्री, मनुष्यबळ व दैनंदिन आवती खर्च इ.साठी अंदाजे १०७ कोटी ९४ लाख इतका खर्च अपेक्षित आहे. उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेने आवश्यक पदे भरण्यात येतील.

# भाविकांची गैरसोय होणार नाही असे नियोजन करा-जिल्हाधिकारी

## कचारगड यात्रा पुर्वतयारी आढावा

**गोंदिया:-** जिल्ह्यातील सालेकसा तालुक्यातील “कचारगड’ हे आदिवासी बांधवांचे श्रध्दास्थान असून या ठिकाणी भाविक दरवषी मोठ्या श्रध्देने लाखोंच्या संख्येत यात्रेत सहभागी होत असतात. त्यामुळे यात्रेदरम्यान भाविकांची कोणतीही गैरसोय होणार नाही यादृष्टीने यंत्रणांनी आपसात समन्वय ठेवून जबाबदारीने कामे करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी संबंधित विभागाला दिले.

पारी कुपार लिंगो माँ कंकाली देवस्थान कचारगड येथील सभागृहात आायोजित यात्रेसंदर्भात पुर्वतयारीचा आढावा घेण्यात आला, त्यावेळी श्री. नायर बोलत होते. जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगनथम, पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अपर पोलीस अधीक्षक नित्यानंद झा, उपविभागीय अधिकारी देवरी सत्यम गांधी, उपविभागीय पोलीस अधिकारी विवेक पाटील, कचारगड देवस्थान समितीचे अध्यक्ष दुर्गाप्रसाद कोकोडे व माजी आमदार संजय पुराम मंचावर उपस्थित होते.



जिल्हाधिकारी श्री. नायर म्हणाले, कचारगड यात्रेचे आयोजन २२ फेब्रुवारी ते २६ फेब्रुवारी २०२४ दरम्यान (५ दिवस) करण्यात आलेले आहे. यात्रेदरम्यान कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने पोलीस बंदोबस्त चोख ठेवण्यात यावा. कार्यकारी अभियंता पीडब्ल्युडी क्र.१ व २ तसेच जि.प. कार्यकारी अभियंता यांनी रस्त्यांची खड्डे बुजविण्याचे काम त्वरित करावे. शाखा अभियंता जि.प. ग्रामीण पाणी पुरवठा यांनी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करुन क्लोरिनेशन करावे. ग्रामसेवकाने विद्युत विभागामार्फत पथदिवे लावण्याचे काम दोन दिवसात पूर्ण करावे. भाविकांच्या आरोग्याच्या दृष्टीने आरोग्य विभागाने पुरेशा औषधांचा साठा उपलब्ध करुन ठेवावा, तसेच आरोग्य पथके स्थापित करण्यात यावी. अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अन्न निरीक्षकाने दुकानातील खाद्य पदार्थांची नियमित तपासणी करावी. कार्यकारी अभियंता सा.बां. विभागाने भाविकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने बॅरिकेटींग त्वरित लावावे. एस.टी. महामंडळाच्या आगार प्रमुखाने पुरेशा बसेसची व्यवस्था करावी. नगरपंचायत मुख्याधिकारी सालेकसा यांनी अग्नीशमनीची व्यवस्था करावी. नगरपंचायत मार्फत साफ-सफाई करण्याकडे विशेष लक्ष्य दयावे. यात्रे दरम्यान योग्य ठिकाणी १२ सिसिटीव्ही कॅमेरे लावण्याचे नियोजन करण्यात आले आहे. जवळपास ५०० ते ६०० वाहने ठेवण्याची पार्कींग व्यवस्था करण्यात आलेली आहे. व्हीव्हीआयपी मान्यवर आले तर त्यांच्यासाठी हेलिपॅड तयार करण्यात आले आहे. यात्रेदरम्यान भाविकांना सोयी-सुविधा पुरविण्याची जबाबदारी यंत्रणांची आहे, त्यामुळे सदर यात्रा चांगल्या पध्दतीने पार पडेल याची खबरदारी घ्यावी असे त्यांनी सांगितले.

पोलीस अधीक्षक श्री. पिंगळे म्हणाले, गेल्यावर्षी प्रमाणे यावर्षी सुध्दा हा कार्यक्रम सुव्यवस्थीत पार पाडण्यात यावा. यात्रेच्या अनुषंगाने भाविकांना नाहक त्रास होणार नाही याची काळजी घेतली जावी. सर्व प्रश्न शांततेच्या मार्गाने सोडविण्यात यावे. सदर ठिकाणी कोणताही पक्षपात करु नये. सर्व यंत्रणांनी एकमेकांच्या समन्वयातून आपआपली जबाबदारी चोखपणे पार पाडावी. सर्वांनी शिस्तबध्द पध्दतीने सदर यात्रेचा कार्यक्रम पार पाडावा असे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविक कचारगड देवस्थ-ान समितीचे अध्यक्ष दुर्गाप्रसाद कोकोडे यांनी केले. सालेकसा तालुका मुख्यालयापासून ६ कि.मी. अंतरावर हाजरा फॉल निसर्गरम्य पर्यटन स्थळ असून जवळच आदिवासी कुलदैवतेचे श्रध्दास्थान म्हणून कचारगड देवस्थान आहे. या ठिकाणी दरवर्षी फेब्रुवारी माघ पोर्णिमेनिमित्त पाच दिवसाच्या यात्रेचे आयोजन करण्यात येते व आदिवासी महासंमेलना निमीत्त या यात्रेस मोठ्या प्रमाणात मध्यप्रदेश, छत्तीसगड, झारखंड, बिहार, महाराष्ट्र व इतर राज्यातून भाविक येथे मोठ्या श्रध्देने लाखोंच्या संख्येत येत असतात, असे त्यांनी सांगितले.

सभेला जिल्हा नियोजन अधिकारी सुनिल धोंगडे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नितीन कापसे, प्रभारी तहसिलदार अभिलाष जगताप, गटविकास अधिकारी दिलीप खोटेले, कोसमतर्रा गावच्या सरपंच सिंधू घरल व विविध विभागाचे कार्यालय प्रमुख यावेळी उपस्थित होते.

# पशुसंवर्धन विभागात ७० टक्के पदे रिक्त

**गोंदिया:** जिल्ह्यातील पशुसंवर्धन विभगात अनेक वर्षांपासून ३३ सार्वजनिक उपक्रम कार्यरत आहेत. पदे रिक्त आहेत. त्यामुळे पशुपालकांना जनावरांच्या उपचारात अडचणी येत आहेत. काहींना खासगी डॉक्टरांकडून उपचार घ्यावे लागतात. त्यामुळे सुविधा असूनही पशुपालकांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. गोंदिया जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागात ७० पदे रिक्त असल्याने पशुपालक अडचणीत आले आहेत.

जिल्ह्याता आठ तहसील असून त्याअंतर्गत ४१ प्रथम श्रेणी पशुवैद्यकीय दवाखाने, ३० द्वितीय श्रेणीचे दवाखाने आणि एक फिरते दवाखाना असे ७२ दवाखाने पशुपालकांवर उपचार करत आहेत. गेल्या अनेक वर्षापासून पशुधन अधिकाऱ्यांच्या मागण्यांकडे शासन लक्ष देत नाही. तरीही कमी मनुष्यबळात चांगली सेवा देण्याचा प्रयत्न गोंदिया जिल्ह्यात कार्यरत अधिकारी करत आहेत. मात्र त्यांना अनेक ठिकाणी पोहोचता येत नाही. अशा परिस्थितीत पशुपालकांना आपल्या जनावरांवर खासगी डॉक्टरांकडून उपचार करावे लागत आहेत.

### पशुपालकांच्या मदतीसाठी फिरते पथक



### २३ पशुधन विकास अधिकारी नाही

**निम्म्याहून अधिक प्रथम श्रेणीची पशुवैद्यकीय रुग्णालये आहेत. मात्र काही रुग्णालयांमध्ये पशुधन विकास अधिकारी नाहीत. अशा परिस्थितीत पशुपालकांना आपल्या जनावरांच्या उपचारासाठी खासगी मदत घ्यावी लागते. गोंदिया जिल्ह्यात पशुधन विकास अधिकाऱ्यांची ४९ पदे मंजूर असतानाही २६ पदेच भरली आहेत. त्यामुळे २३ पदे रिक्त आहेत.**

### रिक्त पदांमुळे ताण, ११ पट्टेधारकांची गरज

**गोंदिया जिल्ह्यासाठी मंजूर पट्टेधारकांची संख्या ३४ आहे. परंतु संध्या २३ पट्टेदार कार्यरत आहेत. त्यापैकी ११ जागा रिक्त आहेत. पर्यवेक्षकांची ४० पदे मंजूर असून २९ पदे भरलेली असून ११ पदे रिक्त आहेत. परिचरांची ८७ पदे मंजूर असून त्यापैकी ६२ पदे भरलेली असून परिचरांची २५ पदे रिक्त आहेत.**